

# ओंजळ
# फुलांची
२०१८-१९


व्हीएसपीएम अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन
द्वारा संचालित

## अरविंदबाबू देशमुख महाविद्यालय, भारसिंगी

e-mail : admv_bharsingi@rediffmail.com
website :www.adm.edu.in, Ph & Fax : 07105-233329, 233537, 233533

# व्हीएसपीएम अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन, नागपूर

## संचालक मंडळ




**मा.रणजीतबाबू देशमुख**
अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री.एस.बी.देशमुख | उपाध्यक्ष |
| श्री.वाय.डी.चालखोर | सचिव |
| श्री.डी.वाय.राऊत | सहसचिव |
| श्री.के.के.नटराजन | सहसचिव |
| श्री.एस.सी.देशमुख | कोषाध्यक्ष |
| श्री.ए.आर.देशमुख | सदस्य |
| श्री.सी.के.बरेठिया | सदस्य |
| श्री.पी.एन.मक्रमपूरे | सदस्य |
| श्री.एस.एम.बांदरे | सदस्य |
| श्री.ए.एस.पारेख | सदस्य |

# प्राचार्यांचे मनोगत



ओंजळ फुलांची हा आमच्या महाविद्यालयाचा वार्षिकांक प्रकाशित होतांना खरचं मनाला अतिशय आनंद होत आहे. कस्तुरी मृगाच्या कस्तुरीचा सुगंध जसा आसमंतात दरवळत असतो. त्याचप्रमाणे महाविद्यालयातील अनेक अमुल्य क्षणांचा सुगंधी ठेवा आमचे विद्यार्थी जतन करून आपल्या सोबत घेऊन जात असतात. याचेच एक प्रतिबिंब वार्षिकांकाच्या निमित्त्याने साकारत असते.

सद्य परिस्थितीत पर्यावरण हा महत्वाचा विषय सर्वांनाच भेडसावित आहे नव्हे, आमच्या अफाट लोकसंख्येच्या देशात ती एक समस्या झालेली आहे. त्यामुळेच या सत्रात पर्यावरण विषयाला महत्व देत अनेकविध लेखनसामुग्री आमच्या विद्यार्थ्यांकडून मागविण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे आमच्या प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी अनेकविध मोलाची कामगिरी या क्षेत्रात केलेली आहे. चार भिंतीच्या आतील शिक्षणासोबतच सामाजिक बांधीलकी जपणारे अनेक प्रकल्प आपण राबविले पाहिजे. ही आमची पक्की धारणा आहे व त्या दृष्टीने आमचे सतत प्रयत्न सुरु असतात. हे या अंकाचे अवलोकन करतांना आपल्याला दिसून येईल. यामध्ये आमच्या संस्थेचे अध्यक्ष मा.रणजीतबाबू देशमुख, संस्थापक डॉ.भाऊसाहेब भोगे आमच्या सदोदीत पाठीशी असणारे महाविद्यालयाचे सहसचिव श्री.दिनकरराव राऊत तसेच संस्थेच्या सर्व पदाधिकारी यांच्या या यशामध्ये फार मोठा वाटा आहे.

कुठेलही सुंदर शिल्प घडविण्यासाठी सात गोष्टींची आवश्यकता असते. यापैकी पहिला व महत्वाचा घटक म्हणजे शिल्प घडविणारा शिल्पकार हा होय. इतर घटकांमध्ये कच्चा माल, शिल्पकलेचे ज्ञान, उपकरणे, ईच्छा, कल्पकता व प्रयत्नांची पराकाष्ठा अशा सर्व बाबींचा जेव्हा मेळ जमतो. तेव्हा उत्कृष्ट शिल्प घडत असतं. आमच्या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी हे सदोदीत प्रयत्नांची पराकाष्टा करून उत्कृष्ट निर्मितीची कास धरीत असतात. हा वार्षिकांक तयार करतांना या संपदक मंडळाचे, सर्व कर्मचारी वृंदाचे मी कौतुक सोबतच हार्दिक अभिनंदन करतो.

शेवटी कळीचे फुलात रूपांतर होतांना जशी एक – एक पाकळी उमलत जावी त्याचप्रमाणे आपणही या ओंजळ फुलांची पाने अलगद चाळतांना मोहना स्वरुपी फुलणाऱ्या सुंदर फुलाचा आस्वाद घ्यावा, हीच अपेक्षा व आशा.

**डॉ. विजय धोटे**
प्राचार्य

# संपादकीय



**''ओंजळ ही भरली शब्दसुमनांनी**
**मनोभावे अर्पण केली विद्यार्थ्यांनी**
**ओंजळीत कथा, कविता आणि साहित्य**
**प्रत्येकाने एकदातरी वाचावी नित्य''**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रयत्नातून साकार झालेला 'ओंजळ' हा वार्षिकांक यावर्षीही पूर्णत्वास आला. खरोखरच विद्यार्थ्यांच्या तरल व उत्स्फूर्त भावना आणि विचारांचा वेध घेण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावर वार्षिकांत निर्मिती हे एक प्रभावी माध्यम असते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये अनेक कवी, लेखक दडलेले असतात. वार्षिकांकातील लेखनाच्या निमित्याने विद्यार्थ्यांची मन:स्थिती, वैचारिक जडणघडण व त्यांच्या भविष्याविषयी असलेल्या भावना व कल्पना अभिव्यक्त होत असतात. विद्यार्थ्यांमधील प्रतिभाशक्ती विकसीत व्हावी, त्यांचे व्यक्तिमत्व सामाजिक, सांस्कृतिक व वाङ्मयीन संस्काराने फुलून यावे यासाठीच वार्षिकांकाची आवश्यकता असते. विद्यार्थ्यांच्या प्रतिभेचे सौंदर्य टिपण्यासाठीच 'ओंजळ' हा वार्षिकांत आकारास आला.

वार्षिकांकाच्या प्रकाशनासाठी साहित्य मागविले, त्याला विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद दिला व हळूहळू साहित्याचा प्रवाह सुरू झाला आणि एवढे साहित्य गोळा झाले की त्यातील उत्कृष्ट साहित्य निवडावे लागले. त्याकरीता वाङ्मय समीतीचे सहकार्य लाभले. 'ओंजळ'च्या जडणघडणीत अनेकांचे सहकार्य लाभले. त्या सर्वांचा नामनिर्देश इथे करणे शक्य नसले तरी त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतांना मला आनंद वाटतो.

संस्थेचे अध्यक्ष मा.रणजीतबाबू देशमुख, संस्थापक मा.डॉ.भाऊसाहेब भोगे, तसेच संस्थेचे कार्यकारी मंडळ व स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य यांचे सदोदीत मार्गदर्शन व सहकार्य लाभले तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय धोटे यांनी 'ओंजळ' प्रकाशीत करण्यास प्रेरणा दिली. साहित्याची योग्य निवड करण्याकरीता प्रा.पुसाम, प्रा.डॉ.पवार, प्रा.उपासे, प्रा.वाळके, प्रा.घोरपडे, प्रा.नांदगावे, प्रा.गायकवाड, प्रा.देशमुख, प्रा.ठाकरे, श्री.अशोकराव घारपुरे या सर्वांचे सहकार्य लाभले. तसेच महाविद्यालयीन सर्वच कर्मचारी वर्गाचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रूपात सहकार्य लाभले आणि त्यातूनच आज ''ओंजळ''हा वार्षिकांक साकार झाला.

**''ओंजळीत आहे भाषा भगिनी इंग्रजी, मराठी आणि हिंदी**
**विद्यार्थ्यांना मिळाली विचार व्यक्त करण्याची संधी''**

शेवटी पुन्हा एकदा ओंजळच्या सर्वच शिल्पकारांविषयी कृतज्ञता व्यक्त करून मी माझ्या लेखणीला विराम देते.

**प्रा.डॉ.साधना जिचकार**
**संपादक**

# मराठी विभाग

प्रभारी प्राध्यापिका

**प्रा.डॉ.सौ.साधना जिचकार**

# स्वच्छ भारताचे स्वप्न अभियानाने पूर्ण होईल कां?

रवि आर. फंदी
बी.ए.भाग - १

आपल्या भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महात्मा गांधी स्वच्छता अभियान सुरू केले आहे. उशिरा का होईना या मोठ्या समस्येकडे लक्ष तर गेले. पण खरच काय फक्त अभियान राबवुन भारत स्वच्छतेचे स्वप्न पूर्ण होईल काय? या अभियानाचा आज वेगळाच फायदा घेतांना दिसत आहे. रोजच्या वृत्तपत्रात मात्र हे फक्त हातात झाडू घेऊन पोझ दिलेले फोटो असतात. अनेक सामाजिक कार्यकर्ते व पक्ष नेते या अभियानाचा फायदा फोटो काढून वृत्तपत्रात येण्यासाठी करतात तर खरच अशा प्रकारच्या वृत्तांनी व फोटोनी भारत स्वच्छ होईल काय?

आज भारतात पर्यावरण संरक्षण अभियान, बेटी बचाव अभियान सुरू आहे. तरी मात्र या समस्या वाढतच आहे. कारण या अभियानांना कृतीची जोड मिळत नाही. आणि आज भारत स्वच्छता अभियानाला कृतीची नाही तर फोटोची जोड मिळत आहे. कोणतेही कार्य पुर्ण करण्यासाठी कृतीची जोड अत्यंत आवश्यक असते. आज भारत पोलीओ मुक्त झाला कारण या अभियानाला मोठ्या प्रमाणात समाज सहभागाची व कृतीची जोड मिळाली. त्याचप्रमाणे भारत स्वच्छता अभियानासाठी कृतीची जोड पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला याची जाण असावी. स्वच्छता ही जबाबदारी कोणत्याही एका व्यक्तीची, संस्थेची किंवा कार्यकर्ता यांची नाही तर ही जवाबदारी प्रत्येक व्यक्ती व समाजाची आहे. स्वच्छता अभियानाला कायदयाचीही जोड असणे आवश्यक आहे. कचरा फेकणाऱ्याला दिसता क्षणी दंड आकारण्यात यावा, ठिकठिकाणी कचरा पेट्या ठेवाव्यात तसेच स्वच्छतेची सुरूवात स्वत:पासुन करावी तेव्हाच स्वच्छतेचे स्वप्न पूर्ण होण्यास मदत होईल.

गाडगे महाराजांनी प्रथम स्वच्छता उपक्रमाची सुरूवात केली. कोणताही स्वार्थ न ठेवता ते परिसर स्वच्छ करीत असत म्हणून आज त्यांच्या स्मरणासाठी त्याच्या कृतीची आठवण होते. माणसाने चांगले कार्य केले तर ते समाजाच्या मनात आपोआप बसतात. त्यासाठी त्यांची फोटो वृत्तांत देण्याची गरज नसते. स्वच्छ भारत अभियानाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कृतीची जोड मिळाली तर हे स्वप्न पूर्ण होईल.

## जगून बघ

जन्माला आला आहेस थोडं जगून बघ
जीवनात दु:ख खुप आहे, थोडं सोसुन बघ
चिमुटभर दु:खाने कोसळू नकोस
दु:खाचे पहाड चढून बघ
यशाची चव चाखून बघ
अपयश येते निरखून बघ
डाव मांडणं सोपं असतं थोडं खेळून बघं
घरटं बांधणं सोपं असतं, थोडी मेहनत करून बघ
जगणं कठीण असतं, मरणं सोपं असतं
दोन्हीतल्या वेदना झेलून बघं ...

कु.पुजा व्ही. मारोतकर
बी.ए.भाग - ३

# जागतिक शांतता आणि गांधीवाद

शुभम एस. वानखेडे
बी.ए.भाग - २

माणुस शांततेचा विचार हजारो वर्षापासून आजपयंत करीत आलेला आहे. तरीही मानवी मन आणि जगाला स्थायी शांती प्राप्त होऊ शकली नाही, ही वस्तुस्थिती आहे. जगभरात विविध लोकांनी आपापल्या स्थळी, काळी परिस्थितीप्रमाणे जागतिक शांततेचा विचार केलेला आहे. एकविसाव्या शतकाच्या सुरूवातीस जगभरात महायुद्धे राष्ट्रा–राष्ट्रातील संघर्ष, धार्मिक मुलतत्ववाद, दहशतवाद यांनी धुमाकुळ घातलेला दिसतो. अशा वातावरणात एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राकडे भेदरलेल्या अवस्थेत पाहत असतांना दिसतो. त्यातुनच मानवी शांततेला आणि जागतिक शांततेला खरा धोका निर्माण झालेला आहे. या अशांततेच्या मुळाशी जावुन पर्यायी व्यवस्था निर्माण करणे जागतिक शांततेला आवश्यक ठरते.

जागतिक व्यवस्थेला नियंत्रित व प्रभावी करणाऱ्या साम्यवाद आणि भांडवलशाही लोकशाही व्यवस्थांना जागतिक शांतता निर्माण करण्यात अपयश आलेले आहे. या पार्श्वभुमीवर जगभरातल्या मानवतावादी पर्यावरणवादी, स्त्रीवादी चळवळींनी गांधीवादाकडे पर्यायी विचार व व्यवस्था म्हणून पाहण्यास सुरूवात केली आहे. अमेरिकेचे मार्टीन ल्युथर किंग, अफ्रिकेत नेल्सन मंडेला, आपल्या शेजारी असलेल्या म्यानमार मध्ये ऑन–साँगसुकी इ. गांधीवादी विचारातुन परिवर्तनाची क्षमतेची लोकशाहीची लढाई यशस्वी केलेली आहे. आजचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा हे देखील गांधीवादी विचाराने प्रभावी झाले आहेत.

सर्वच धर्मांनी अहिंसा एक महत्वाचे मुल्य मानले आहेत. परंतु महात्मा गांधीजींनी या मुल्याला सामाजिक व राजकीय परिमाण दिले. व्यक्तिगत जीवनाप्रमाणे सामाजिक व राजकिय जीवनात सत्य शोधण्याचा, सत्य प्रस्थापित करण्याचा मार्ग म्हणुन त्यांनी अहिंसेचा पुरस्कार केला.

अहिंसेचे आवाहन म्हणजे शेवटी व्यक्तीच्या सदसद विवेक बुद्धीला केलेले आव्हान आहे. आत्माची प्रतिष्ठा राखण्याबद्दलचा हा आग्रह आहे. अहिंसा हे साधन आहे, तर सत्य हे साध्य आहे. किंबहुना सत्य म्हणजेच अहिंसा. गांधी म्हणत, तुम्ही जर साधनाबद्दलचा विवेक राखला तर साध्य आपोआप सिद्ध होईल, पण जरी सत्य आणि अहिंसा जवळ–जवळ एकच अर्थाच्या संज्ञा असल्या तरी दोन्हीपैकी एकाची निवड करण्याचा प्रसंग आला तर सत्याचीच निवड केली पाहिजे. कारण तेच सर्वोच्च आहे.

दुर्बलाच्या अहिंसेचे उदात्तीकरण करण्यापेक्षा,
सत्याची कास धरलेली केव्हाही श्रेष्ठ...

महात्मा गांधीजीनी साधन सुचितेच्या विचार मांडून असे म्हटले आहे की, सत्य आणि शांतीच्या प्राप्तीसाठी अहिंसेच्याच मार्गानी गेले पाहिजेत. गांधी साध्य साधन भेद मानीत नाहीत. शुद्ध साधन वापरूनच प्रयत्न केल्याने साध्य प्राप्त होते. कारण साध्य साधनाचे अदैत्व असते.

याउलट राष्ट्रीय चळवळीच्या संदर्भात स्वतंत्र्य मिळविण्यासाठी कोणताही मार्ग न्यायच ठरेल. कारण चांगले साध्य असने पुरेशे असते. असा विचार सावरकरांनी मांडला. लोकमान्य टिळक यांनी साधन सुचितेपेक्षा कोणते साधन अधिक प्रभावी व सोईचे ठरेल यालाच महत्व दिलेले आढळते.

स्थायी जागतीक शांतता निर्माण होण्यासाठी उपरोक्त गांधीच्या विचारांप्रमाणे प्रयत्न करावे लागतील. तरच स्थायी जागतिक शांतता प्रस्थापित होऊ शकेल. गांधीचे अहिंसा, सत्याग्रह व साधनसुचीते बद्दलचे विचार जात, धर्म, भाषा, प्रदेश हे राष्ट्र यांच्या सिमा ओलांडून जाणाऱ्या आहेत.

माणुस केंद्रबिंदु ठेवून त्यांनी सत्य व अहिंसेचा विचार केलेला आहे. आणि म्हणूनच युनो ने सुद्धा गांधी विचारांना मान्यता देत २ ऑक्टोबर हा जागतिक अहिंसा दिन म्हणून घोषित केलेला आहे.

# स्मृती स्थळातील समाजदर्शन

अनिल दामोधर डेहनकर
बी.कॉम.भाग - २

बिनीच्या महानुभाव ग्रंथकारांची माहिती देणारा स्मृतीस्थळ हा प्राचीनतम ग्रंथ शके १२३० च्या दरम्यान परशरास व्यास व नरेंद्र यांनी लिहीला असावा. पुढे त्यात अनेकांनी संस्करण केली. महानुभाव वाङमय कालाच्या दृष्टीने श्रृती, सृष्टी, वृद्धाचार, मार्गरूढी आणि वर्तमान अशा पाच भागात विभागले आहे.

नागदेवाचार्याच्या कालखंडातील ग्रंथरचना व त्यांचे स्मृती स्थळासारखे चरित्र स्मृतीत मोडते. या ग्रंथातून महानुभाव पंथज्ञचे पहिले आचार्य नागदेवाचार्य यांच्या मृत्यूपर्यंतच्या यादवकालीन समाजाची विश्वसनिय माहिती मिळते. लीळाचरित्रात चक्रधरास जे स्थान आहे. तेच स्थान स्मृतिस्थळात नागदेवाचार्यांना आहे पण लिळाचरित्राच्या मानाने या ग्रंथाची भाषा सरस नाही. मोजके शब्द आणि वर्णनातील संयम यामुळे येथील रचना लीळाचरित्र आणि सूत्रपाठ या महानुभावीय ग्रंथाच्या रिंगणात फिरते.

येथे नकळत साधलेला शांत अद्‌भूत आणि करूणरस रचनेच्या दृष्टीने वैशिष्टपूर्ण आहे. एके दिवशी ब्राम्हणांनी नागदेवाचार्यांना विचारले की, तुमची मुर्ती झळझळीत दिसते. तेव्हा तुम्ही त्रिकाल स्नान करता काय ? तंव भंटोबासी म्हणितले: गगनि तारंगणे झळकताती: ते काइ: त्याचे मंदिर झळकत दिसते : की आंतू (ल) आहेतो झळकतयि. येथील शांतरस, तर स्मृ १९८ मधील करूणरस उल्लेखनिय आहे. म्हाइंभटाचा प्रवास संपल्यावर त्यांच शरीर फार शिणले आणि आपले वास्तव्य आता लवकरच संपणार याची चाहुल त्यांना लागली, तेव्हा ऐके दिवशी आपले पूर्वाआयुष्य आठवून ते म्हणतात – मग एकुदिसु म्हाइंभटी भटोव्यासोत म्हणतिले भटो मज देवो होईल, असेच करूणदश्य दिसते. एकदा फार दुष्काळ पडला तेव्हा कविश्वर व्यास सर्व भिक्क्षुकांसहित पुरंदरकडे निघाले. पुढे डोंबेग्रामीचे शिष्य दंतगोपाळ यांचे शरीर फार थकले होते म्हणून ते चंदनवदना ला राहिले. तेथील राजाने अन्नछत्र सुरू केले होते. तेथे ते भिक्षा मागत एक दिसु नगरावरूते थैलाकडीला डोंगरी अघोपरी यैसे दाही धोंडेयांचीये संदी देह ठेवीले : छीन्न स्थळी धोंडेयाखाली घातली: आणि धोंडेयासि खडेनि लीहीले: येथ छीन्नस्थाळे असे: अशाप्रकारे येथील दंतगोपाळ बायाच्या मृत्यूचे वर्णन हृदयद्रावक आहे.

उदा : जिथे चुलीची खीर खादली : तिथे चुलीची काइ राख खाल, अशाप्रकारची वाक्यरचना येथे आहे.

शब्दाच्या दृष्टीने तत्सम: तभ्रत व देश्य शब्द आणि मासा–दिसा–जोगिया–जंगमाचे असे जोड शब्द वापरून लेखकाने यास आकर्षक बनविले. तर घेया घेया बाप माझे, असे लीळाचरित्राच्या धर्मीचे वाक्यप्रचार मराठी भाषिकात आपुलकी निर्माण अरते. आणि साहजिकच त्याकाळचा समाज कसा असावा हे जाणण्याची उत्सुकता वाटते. ती पुरविण्याचे सामर्थ्य या ग्रंथात जरूर आहे.

# तुकोबांची अद्‌भुत कवित्वशक्ती

कु.सोनाली एम. बसीवार
बी.ए.भाग - १

वारकरी संप्रदाय म्हणजे १२ व्या शतकापासून तर २० व्या शतकापर्यंत आपली वैचारिक सत्ता जनमानसावर गाजविणारा संप्रदाय. भारतीय समाज आणि त्यातही महाराष्ट्र ही नररत्नाची खाण, त्यातही विदर्भाच्या सोन्याची कराड असलेल्या भुमीत श्री संत तुकाराम महाराज जणु साम्राज्य सुर्य या भुमीवर अवतरले आणि साहित्याची आहुती देऊन या वारकरी संप्रदायाचं वैभवशाली स्वरूप सर्वसामान्य लोकांसमोर उभे केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि वर्णव्यवस्था यांच्या जुलमी जाचक रूढीमध्ये बंदीस्त झालेल्या महाराष्ट्रीयन समाजाला या संप्रदायाने भक्तीच्या माध्यमातून पंढरीच्या वाळवंटात एकत्र केले आणि अनेक जातीधर्माच्या व्यवसायाच्या लोकांना एकत्र आणुन त्याकाळीही आध्यात्मिक लोकशाहीची मुहूर्तमेढ रोवली. ज्या शक्तीच्या भरभक्कम पायावर आजचा विवेकवादी महाराष्ट्रीय समाज उभा असलेला आपणाला जाणवतो. या संप्रदायातील संताविषयीचा आदरभाव आजही ज्ञानेश्वरीची सप्तसती साजरी करून आणि दरवर्षी आषाढी एकादशीला पंढरीची वारी काढून व्यक्त करतो. (परंतु वारकरी संप्रदायाच्या या अचाट कार्यक्रमाप्रमाणे वारकरी संत अद्‌भुत रूपाने उभे आहेत) ज्ञानेश्वरापासून तर तुकडोबा पर्यंत साऱ्याच संतांनी आपल्या चारित्र्याची आणि साहित्याची आहूती देऊन या संप्रदायाचं वैभवशाली स्वरूप उभे केलेले आहे. हे सत्य नाकारता येत नाही.

तुकारामांची साहित्य संपदा अर्वाचीन साहित्यिकांनाही प्रेरणास्त्रोत ठरणारी आहे. किंबहुना ज्ञानेश्वरीची प्रतीकृती म्हणजेच त्यानंतरचा भागवतधर्मीय संतांनी महाराष्ट्रात निर्माण केलेले साहित्य होय. एकनाथ, तुकाराम, रामदास, नामदेव हे जे थोर संत होऊन गेलेत. या साऱ्या संतांनी ज्ञानेश्वरीतील विचारच जनमानसात पसरविण्याचे कार्य केलेले आहे. तुकारामांची संत सज्जनांची लक्षणे तुकोबाच्या अभंग गाथेतून दिसून येते. आध्यात्माची उंची गाठणारे तत्व विवेचन यांच्या अभंगातून दिसून येते.

तुकारामांचे कार्य केवळ एका विशिष्ट समाजापुरते मर्यादित नसुन ते व्यापक पातळीवर अनेक जाती जमातीतील लोकांना त्यांनी आपल्या भक्तीमार्गात सामील करून घेतले आहे. जाती भेद रहित विचारांचा पुरस्कार केला. अपघाती संसार सुखाचा कसा करावा यासाठी त्यांनी जनसामान्यांतून आपले आध्यात्मिक भक्ती साधनेद्वारे सोपी पायवाट निर्माण केली. ज्ञानदेवानी रचलेल्या भागवत संप्रदायाच्या इमारतीवर कळस होण्याचे भाग्य तुकोबांनाच लाभले. आपल्या ४५२९ अभंगाच्या माध्यमातून त्यांनी लौकीक परलौकीक जीवन अत्यंत उत्कटपणे अविस्कृत करून लोकांच्या अंतकरणावर भागवत संप्रदायाची अमीट छाप उमटवली.

देहूच्या या तुकावाण्यांपासून संत तुकाराम होण्यापर्यंत आध्यात्मिक प्रवास म्हणजे तुकारामांचे अभंग होय. सामाजिक छळांपासून हे व्यक्तीमत्व विकसीत होऊन त्या लोकांच्या चटक्यांमधून उत्कट काव्यानुभव त्यांनी व्यक्त केलेले आहे. तुकाबांची अभंगवाणी तुकारामांच्या व्यक्तीगत आणि सामाजिक जीवनानुभवातून जन्माला आली. आपले सारे कार्य त्यांनी या अभंगातून ओतले आहे. त्यामुळे तुकारामांची कविता सुंदर अश्या जीवनभाश्याचे रूप धारण करते. ही वाणी कधी मेणाहून मऊ तर कधी वज्राहूनही कठोर बनते. त्यांच्या आत्मपर अभंगातून भावनेची उत्कटता आणि हळूवार पणा दिसतो.

मऊ मेणाहूनही । आम्ही विष्णूदास
कठीण वज्रास । भेदू ऐसे

तुकाराम हे वाक्य वारकरी पंथाचे धर्मप्रसारक होते. अल्पाक्षर रमणीयत्व हे तुकारामाच्या काव्याचे वैशिष्ट समजले जाते.

आम्हा घरी धन । शब्दाचीच रत्ने ।
आपुलीया बळे नाही मी बोलत । सखा भगवंत वाचा त्यांची ।

परमेश्वर आपली कविता म्हणविण्यास प्रवृत्त करतो. आपले कवित्व ही ईश्वराचीच वाणी आहे असे त्यांना वाटते. तुकोबांचे अभंग म्हणजे उत्कृष्ट भावगित आहे. तुकोबांचे अभंग सर्वसामान्य रसिक वाचीत असतांना तुकोबांची मुर्ती प्रत्यक्ष आपल्या डोळापुढे उभी राहते. तुकोबा प्रत्यक्ष वाचकांशी बोलतात की काय? असे वाटते. तुकारामांच्या प्रसादीक वाणीमध्ये मराठी भाषेचे एक विलक्षण मनोहर व साधे स्वरूप आढळते. ते इतरत्र कुठेही आढळत नाही. सोप्या व साध्या शब्दांनी मनावर ठसेल असा उपदेश करतात. त्यांचे दृष्टांत व दाखले हृदयास भिडतील असे आहे. बोलणे पाठीवर व अर्थ चिमुटभर असा प्रकार त्यांच्या अभंगात कुठेही आढळत नाही.

नाही काष्टांचा गुमान । गोवी भ्रमरा सुमन ।

तुकारामांची शब्दरचना गोड असून शब्द जसे कोंदनात बसवावे त्याप्रमाणे तेजाने चमकतात व त्यांच्या बैठकीनेच ते अधिक शोभतात. मनातला अर्थ थोडक्यात विशद करावा व आपल्या कल्पनेला मोहक अशी मुर्त स्वरूप दयावे याचत तुकारामांचे श्रेष्टपणाचे गुढ आहे. त्यांच्या अभंगांचा अर्धाअधिक भाग साधकवस्थेतील असून तो आत्मपर आहे. परमेश्वरांची वाट पाहतांना त्यांच्या मनाची अवस्था पाण्याच्या बाहेर काढलेल्या माश्यांप्रमाणे होते. हे सर्व आत्मपर अभंग आर्ततेने व कारूण्याने ओथंबलेले आहे. त्यांच्या काही अभंगातून भगवी वस्त्रे परिधान करणाऱ्या ढोंगी लोकांचा समाचार घेतांना त्यांची वाणी कठोर होते. त्यांच्या अभंगात दृष्टांत, उपमा, अनुप्रास ई. अलंकार जागोजागी दिसतात व आपल्या मनात अभंगाचा आशय रसिक हृदयाशी ठसवितात. शब्द चमत्कार कमी आणि जीवंत अनुभव व सुक्ष्म निरीक्षण चोळंदळ बुद्धी व मधुर वाणी या गोष्टींनी तुकोबांचे अभंग हे श्रेष्ठ ठरले आहे.

तुकारामांच्या अभंगात मानवी प्रपंचातील हास्यरस त्यांनी जागोजाग टिपला आहे. प्रापंचिकांचा, विषयीजनांचा, लोभी व दांभीक यांचा उपहास करतांनी त्यांनी हास्यविनोद निर्माण केला आहे. दृष्टांत देतांना कुठेही कृत्रिमता दिसत नाही. मनाला चटकन तडाखे लावणाऱ्या दृष्टांताशी ते सहृदय रसिकांना एकरूप करतात. गाढवाला कितीही श्रृंगारले तरीही त्याचे घोडे होत नाही किंवा कुत्र्याला पालखीत बसविले तरी त्याचे भुकणे थांबीत नाही. उपमान्यांच्या रूपाने तुकारामांनी अनेक प्रतिमा योजलेल्या आहेत. त्यांच अतिशय सुक्ष्म निरीक्षण दिसून येते. चंद्र, चकोर, कुमोदिनी भ्रमर इ. ठरावीक उपमाने त्यात आहेच. पण लौकीक व्यवहारातील व कौटूंबिक जीवनातील उपमाने त्यांनी विपूल प्रमाणात योजिलेले आढळतात. अनेक प्रतिमांच्या माध्यमातून त्यांच्या काव्याला रसाळता आलेली आहे.

शुद्ध बीजापोटी । फळ रसाळ गोमटी ही शेतीतील उपमाने
तांबीयांचे नाणे न चले खऱ्या गोले। जरी हिंडवीले देशोदेशी
कन्या सासुराशी जाये । मागे परतोनी पाहे

तर ही कौटुंबिक जीवनातील उपमाने तुकाराम आपल्या काव्यात वापरतात.

तुकोबांचे लिहीणे मोठे सुत्रबद्ध असते. थोड्या शब्दात मोठा अर्थ सांगायचे सामर्थ तुकाबांच्या वाणीत आहे. त्यामुळे तुकोबांच्या कित्येक वचनांना सुभाशितांचा अर्थ प्राप्त झालेला आहे.

जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपले ।
तोच साधु ओळखावा । देव तेथेची जाणावा ।।

ह्या मनीवजा शुभाशितात प्रपंच, परमार्थ, काव्य सर्वकाही आहे. वाणीतील भेदकता, बुद्धीतील स्वतंत्र व अंतरीचा प्रत्यय या तीन गुणामुळे तुकोबांचे कार्य श्रेष्ठ ठरले

आहे. तुकोबांचे अंतकरण अत्यंत पवित्र व त्यात भक्तीरसाचा झरा वाहत असलेला दिसतो. त्यामुळे तुकारामांच्या काव्यात खरी कळकळ व जीव्हाळा भरून राहिलेला आहे. आत्माविष्कार हाच त्यांच्या काव्याचा प्राण आहे. उत्कृष्ट अनुभूती, त्यांचा आत्माविष्कार व जीव्हाळा यामुळे त्यांच्या अभंगात काव्य भरून राहिले आहे. त्यांच्या काव्यशैलीत उत्कटता आणि आवेश आहे. त्वेष आणि तिखटपणा आहे. दुर्जनांना दहशत बसेल असे सामर्थ्य आणि प्रतिकारक क्षमता सज्जनांनी प्राप्त करून घेतल्या खेरीज जगात सत्याचा व सद्‌गुणांचा जय होणार नाही अशी त्यांची धारणा होती. सौजन्य आणि सामर्थ्य यांचा संयोग घडून आणण्याची त्यांच्या अंतकरणातील ही जी आत्यांतीक तळमळ तिच्यात त्यांच्या लोकप्रियतेचे बिज आहे. तुकाबांच्या आत्मचरित्रांच्या स्वरूपांचे साधकावस्थेत आणि सिद्धावस्थेतले अभंग आहेत. ते लेखनपूर्व आत्मनिष्ठेने संपन्न आहे. त्यातील अनुभवांची इमानदारी खनखनीत आहे. आणि या अभंगातून लेखनगर्भ आत्मनिष्ट सहज साधलेली आहे. आत्मनिष्ठबरोबरच अनुभवांची सखोलता ही साधकावस्थेतल्या आणि सिद्धावस्थेतल्या अभंगात जीवंत स्वरूपात प्रत्ययास येते. हे अभंग जळजळीत जाणीवेतून जन्मास आलेले आहे. यातील अभंगरूपाने संगठीत झालेली संवदनशिलता ही आजही ताजी आहे. तुकोबांची वेदक, भेदक व सुचक शब्दकळा अभंगातून आढळते.

तुकोबांची उक्ती आणि कृती यात अखंड मेळ राहिलेला आहे. त्यामुळे त्यांच्या अभंग लेखनाला तेज प्राप्त झाले आहे. तुकारामांच्या साधकावस्थेपासून तर वैकुठगमनापर्यंत त्यांची कवित्वशक्ती श्रेष्ठतम ठरते.

आम्ही जातो आपल्या गावा । आमचा राम राम घ्यावा ।
तुमची आमची हेची भेटी । येथूनीया जन्म तुटी ।।

== लोकगीत ==

# हल्लीचा जमाना

भाऊ जमाना निघलां, चालू भाऊ चालू
खरं कोणाले बोलू ।। धृ ।।

काय सांगू कलयुगाची लवस्टोरी
आता कंडक्टर झाल्या पोरी,
पोरी लागल्या डोलू डोलू
खरं कोणाले बोलू ।। १ ।।

२१ व्या शकतकाचा घेऊ या वारा
भ्रष्टाचारांचा चढला हो पारा
महागाई लागली तोलू भाऊ तोलू
खरं कोणाले बोलू ।। २ ।।

रिती गेली निती गेली कसं होईन बा पुढं
मानेराव दुनिया बर्बादी कडं
राहूल लागला बोलू भाऊ बोलू ।। ३ ।।

कु.आशिका एम. जाने
बी.ए.भाग - २

# पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

प्रणय व्ही. वाटाने
बी.ए.भाग - ३

भारतातील समाजोपयोगी श्रेष्ठ कामगिरी करणाऱ्या अहिल्याबाई होळकर आणि सावित्रीबाई फुले या दोनच स्त्रीया होऊन गेल्यात. तरीसुद्धा त्यात सुकिर्तीमान लोकमाता अहिल्या स्त्रीशक्तीचे स्फूर्तीस्थान गौरवाने म्हटले पाहिजे.

स्त्री अधिकच असुरक्षित व धर्म, रूढी, परंपरेच्या अनेक अनिष्ट बंधनात जखडली जात असतांना ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यात जामखेड तालुक्यातील चोंकी या छोट्याश्या खेड्यात बहुजन समाजातील शिंदेच्या घराण्यात अहिल्याबाईचा जन्म झाला. सुशिलाबाई मानकोजी शिंदेच्या पोटी अहिल्याबाई जन्मास आली. अवघ्या ९ वर्षाच्या असतांनाच मल्हारराव होळकरांचा मुलगा खंडेराव यांच्याशी विवाह झाला. नंतर त्यांना भालेराव व मुक्ताबाई अशी दोन अपत्येही झाली.

१७५४ मध्ये अहिल्याबाईचे पती खंडेराव यांना कुंभेरीच्या रणसंग्रामात विर मरण आले. तेव्हा सती जाने ही प्रथा होती. परंतु अहिल्याबाईंनी सती प्रथा यावर बंद नियम लावला. आणि स्वतःच्या पुरागामीत्वाचा परिचय जनतेला करून दिला. असे अनेक प्रयत्न त्यांनी भारतातील स्त्रीयांकरीता राबविले. धर्म, रूढी, परंपरा या पलीकडे कर्तव्य महत्वाचे मानून रयतेला कल्याणकारी राज्य दिलं.

त्यांनी संपूर्ण भारतात विहीरी, तलाव, कुंड व घाट बांधले. रस्ते, पुल निर्माण केलेत. स्वतःच्या मुलीस प्रजेच्या सुखासाठी पणाला लावणारी जगातील एकमेव राज्यकर्ती स्त्री अहिल्याबाई होय. अहिल्याबाईंनी फक्त एकच धर्म न मानता त्यांनी मानवता धर्मच मानला. धार्मीक कार्य करणे म्हणजे समाजसेवा किंवा राष्ट्रसेवा होय असे त्या मानत होत्या.

त्यांनी ग्रामपंचायतींची स्थापना, कोतवाल पदाची निर्मीती, विनाविलंब न्याय देण्यासाठी न्यायालय, पोलीस यंत्रणा, सैन्य व्यवस्था, स्त्री सैन्य, पाणपोळया, मर्यादीत कुटूंबाचा आदर्श अश्या विधायक कार्याचा सपाटा होता.

# भरारी परिवार

मिळून सारेजन घेऊ भरारी
बनवू व्यक्तीमत्व सक्षम करारी
लेख, कविता, वाद्य, परिचय, अभिनंदन
या गोड सदरांचा आहे सुरेल संगम
प्रत्येक कार्य चांगले करू
असा असतो निश्चितच विश्वास
म्हणूनच आम्हाला असतो
नेहमीच भरारीचा ध्यास
कडू सर आणि काकडे सरांकडून
आम्हाला मिळते मार्गदर्शन व प्रशिक्षण
हेच तर आहे आमचे कला मेळ रंजन
सदैव मनात जपावे असे आठवणीचे क्षण
दहीकर मॅडमचीही असते गप्पांची साथ
कधी ज्ञानाची तर कधी हास्यांची बरसात
भरारीसाठी असतो सदैव आम्ही तयार
म्हणूनच आम्हाला म्हणतात भरारी परिवार

कु.सिमा बेहनिये
बी.ए.भाग - १

# माझे करीअर मी घडविणार

कु.वैष्णवी पी. धिरडे
बी.ए.भाग - २

चल उडूनी पाखरा बघ जरा
पहा किती पसरली वसुंधरा

हा विषय हाती आल्यापासुन याच दोन ओळी माझ्या मनात घर करून राहिल्या होत्या. डोळ्यासमोर येत होतं एक लहानसं पाखरू! इवले-इवले पंख असलेलं, छोट्याश्या चोचीचं, डोळ्यात दिसणाऱ्या प्रत्येक गोष्टीबद्दल जाणवणारं कुतूहल आणि चेहऱ्यावर निळ्या आभाळाचं निळं आव्हान. पेलनारा आत्मविश्वास असणार! चिमना-चिमनीला कळलयं की पिलु आता मोठं झालय, आणि म्हणून ते पिलाला म्हणतात...

चल उठं दुरवर पसरलेली वसुंधरा तू पहा
गगन भरारी मार! या इवल्याश्या पाखराला

परमात्म्याने पंख दिले या डहाळीवरून त्या डहाळीवर उडण्यासाठी! उडण्याची शक्ती दिली म्हणून इवलसं पाखरू सुद्धा उंच आभाळात झेपावतं. आकाशाशी दोस्ती करतं, कारण त्यांच्या उरात असते उडणे!

स्वप्नात उशा तेवर अन,
निशा गात हाकारिते तेथुनि,
क्षणार्धी सुटे पाय निडातून अनं
वीज खेळते मस्त पंखातून

त्या पिलाकडे बघून माझ्या मनात विचार आला आपल्याला पंख आहेत ते कल्पनेचे, आत्मविश्वासाचे, जिद्दीचे अनं मनोहारी आशेचे. मातीशी नाते सांगणारे आपण मनात आणले तर प्रत्येक क्षेत्रात प्रगतीच्या दिशेने झेपावू शकतो.

लहानपणांपासून माझ्यामधल्या सुप्त शक्तीचा, माझ्यातील क्षमतांचा माझ्या आई-बाबांनी, गुरूजनांनी अभ्यास केला. मलाही माझ्यामधल्या गुणांची जाणीव झाली. माझ्यावर झालेल्या संस्कारांनी हेच शिकवलं की, आलेल्या प्रत्येक संधीचं आपण सोनं करायचं.

आणि मग डोक्यात विचारांचे चक्र सुरू झाले, मलाही माझ्या भविष्याचा वेध घ्यायचा आहे आणि मोठं स्वप्न बाळगायचं आहे. उन्हाळ्याच्या सुट्यांमध्ये आईने निरनिराळ्या आदर्श व्यक्तींची मला पुस्तक आणून दिली. स्त्री शिक्षणासाठींचा दरवाजा उघडा करणारे क्रांतीसुर्य महात्मा फुले, क्रांतीज्योती सावित्री फुले, भारतीय संविधानाचे शिल्पकार भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर तसेच भारतीय पोलीस सेवेतील सर्वोच्च पदावर पोहोचणाऱ्या पहिल्या भारतीय स्त्री डॉ.किरण बेदी, आय.ए.एस. ऑफीसर मनिषा म्हैसकर ही सर्व व्यक्तीमत्व वाचल्यावर जाणलं की सर्व मोठी झाली आपल्या कर्तृत्वाने, प्रत्येक ठिकाणी आपल्या कार्यशैलीचा मोहोर त्यांनी उमटविलेला आहे. आणि म्हणूनच ही सर्व मंडळी माझी आयडल आहे. त्यांचं माझ्यावर खुप प्रभाव आहे आणि त्याच क्षणी मी ठरवलं की मी पण माझं करीअर घडविन. अर्थात मी माझं करिअर घडवित असतांना आई-बाबांचा मार्गदर्शन, शिक्षकांचं मार्गदर्शन अतिशय महत्वाचं आहे याची मला जाणीव आहे. मा.अब्दुल कलाम म्हणतात, मोठी स्वप्न बघा, कारण स्वप्नंच नसतील तर स्वप्नपूर्तीसाठी आपल्याला प्रेरणाही नसतील.

ताऱ्यापर्यंत पोहोचता न येणं
हे अवमान कारक नाही पण
पोहोचण्यासाठी तसेच नसनं
हे अवमानकारक आहे

एकविसावं शतक आपण निर्माण केलेल्या ज्ञानाचे आणि माहितीच्या व्यवस्थापनाचा आहे. शिक्षणासाठी विचाराचं आणि कल्पनाशिलतेचं स्वातंत्र्य आवश्यक असतं. या दोन्ही गोष्टी सुसाध्य करून दिल्या त्या माझ्या आई-बाबांनी

व शिक्षकांनी आणि म्हणून श्रम आणि चिकाटी या दोन सुंदर देवदूतांच्या बळावर मी माझं करिअर घडविणार आहे.

बेटी बचाओ आणि बेटी पढाओ किंवा दुरदर्शनवर दाखविल्या जाणाऱ्या मालिका मुलींवर आधारित आहे. विचार केल्यावर लक्षात येते की, समाजात अजूनही आम्हा मुलींना दुय्यम स्थान आहे. आणि मुली नको या नादात मुलींची संख्या कमी झाली आहे.

माझ्या आईबाबांना सगळेच विचारतात, तुम्हाला मुलगां तेव्हा ते म्हणतात, माझ्या तीन मुली ह्याच आमची मुलं आहे. आणि तेव्हाच ठरविले की, मला प्रशासकीय अधिकारी होऊन देशाची सेवा करायची, इतकं कर्तृत्ववान व्हायचयं. आई–बाबांना मोठं नाव दयायचं की त्यांना माझा अभिमान वाटाचा. कवी कुसूमाग्रज म्हणतात,

सार्‍याच कळ्यांना जन्मसिद्ध
हक्क आहे फुलण्याचा
मातीमधला वतन वारसा
आकाशावर कोरण्याचा...

सर्वच क्षेत्रात कमालीची स्पर्धा आहे. या स्पर्धेत गॉड फादरची कृपा तारूण नेत नाही तर त्यासाठी स्वत:च्या क्षमता पणाला लावाव्या लागतात. हे मला नीट समजले आहे. कल्पना चावला पाठोपाठ असिम धैर्याने अंतराळात झेपावलेल्या सुनिताचा आदर्श मनात ठेवला आहे.

मी जशजशी मोठी होईल तसतशी निसर्गातील अनुभव संपन्नता टिपायला जिद्दीने पुढे जाईल. कारण थांबला तो संपला हे मर्म लक्षात घेऊन माझं करिअर मी घडविणार आणि त्या दिशेने वाटचाल करणार आहे. असं म्हणतात...

झेप असावी गरूडाची
नजर असावी ससाण्याची
जिद्द असावी फिनिक्स पक्ष्याची
राखेतून निर्माण होण्याची

# माय आणि लक्ष्मी

उभ्या भिंती सारवताना माय दिसली
की, आम्ही समजायचो दिवाळी आली

सावकाराच्या घराकडे, बापाच्या येरझारा वाढल्या
आमच्या स्वप्नात कपडे, फटाके कानुले न् चकल्या

स्वत:च्या लुगड्याला दांडी भरत माय
मला म्हणे बापू शिंप्याकडे जाय

लक्ष्मीची पूजा करताना मायच्या जिवाचा घाम
रक्ताचं पाणी ...
पण तिच्या घराकडे लक्ष्मीची पाठ
साता जन्माच्या सवतीवानी

माझी माय समजण्याइतपत
लक्ष्मीची बौद्धिकपातळी नव्हती
अन् तिच्यासाठी थांबायला
मायजवळ तरी कुठं फुरसत होती?

आता माझ्या पोरांसोबत लक्ष्मी
उपऱ्यावानी खेळते
कुठं माय दिसत नाही म्हणून
पश्चातापानं रडते.

कु.शितल बाबाराव गवळी
बी.कॉम.भाग - १

# माझं काय चुकलं?

प्रविण श्रीराम ठोंबरे
बी.कॉम.भाग - २

माणसाला मोठी संकट आली तरी त्यांच्याशी झुंजणं प्रत्येकालाच शक्य होत नाही. कित्येकदा प्रयत्न करूनही अपयश आणि निराशा जन्मभर साथ सोडत नाही. पण साधारणपणे बहुतेकांना संसारात ज्या अडचणी येतात त्यात थोडी फेरबदल केला तर पुर करणे शक्य होतं. त्यासाठी कुटूंबातील इतरांची वृत्ती व वर्तमानात बदल करण्याची गरज असावी लागते. केवळ आडकाठीमुळे सुखाचा जीव दुःखात टाकणाऱ्या काही कुटूंबाची ओळख आपणास नेहमीच होत असते. तसेच सरतेशेवटी अचानक डोळसपणा दाखविल्यामुळे या अडचणीचं निराकरण झालं. असेही काही उदाहरणे आहेत, पण त्याला मीच अपवाद का असावे?

माझ्याच बाबतीत असं का घडावं? यालाच नशीब म्हणत असावे. त्यांच्यापेक्षा मोठ्या सुखाची अपेक्षा नव्हतीच मुळी. प्रत्येक मनुष्य आपल्या जीवनात सुख शोधण्याचा प्रयत्न करतो आणि करायला पाहिजे. कदाचित कित्येकांच्या जीवनात सुखाचं माप भरभरून मिळालं असेल पण माझं माप आयुष्याच्या तरूणपणात रितं झालं कुणाचा सुखाचा आड न येता मी माझं सुख शोधण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. यात माझं काय चुकलं?

आज आजुबाजूचा परिसर सुद्धा सुखाचा दिसत नाही. सतत निराशाच यायची तेव्हा वाटायचं. जवळ येऊन दुर जाण्यापेक्षा मनाची ताटातुट होण्यापेक्षा एकटेपणातही आपण सुखी राहु शकतो. काही जबाबदाऱ्या हाताळल्या असत्या तर मला तळमळाची वेळ आली नसती. कारण गुलाबाच्या पाखळ्यावरून चालायची आवडच होती. तर मला काट्यांची भिती का? आणि आज असं निराशाजनक घडावं हे एक न सुटलेलं कोड्च नाही काय? मात्र मुसळाला कोंब फुटावे तसे मनाच्या दगडातून असंख्य प्रश्नाचे घुंमारे बाहेर येतात आपल्यासमोर.

इतरांच्या मनातही प्रश्न निर्माण करतात. तुझ्या पाहुलखुणा तरी मी डोळ्यात कश्या साठवू? जेव्हा वाटायचं वेगळे झाल्यात, सर्व संदर्भच अर्थहीन झालेत. जीवनाचे गवसलेले सुर बेसुर झालेत. जीवनाचा कुठलाही आशेचा किरण मनात दडलेला नाही. यालाही जाणीवपूर्वक मारून टाकलं मी. मेलेल्यांच्या जगात त्यांचा काय उपयोग? कदाचित या घाणेरड्या जगापासून त्याला वाचविण्याचं समाधान जीवनभर राहील. आतादुरपर्यंत फक्त अंधारातच काळाकुट्ट तरी सतेच डोळाने मी ते बघतो आणि तोंडातून शब्द निघतात.

तिच्या आठवणीमुळे मी वर्षानुवर्षे खुश राहलो.
धोकेबाज ती निघाली आणि बदनाम मी झालो
नशिबाची कास तर बघा धुळ चेहऱ्यावर होती
आणि मी आरश्याला धुत राहिलो

निराशेला निराशा देणारी निराशा. ही निराशाच पदरी टाकलीस तू. तु या क्षणाचा कधीच विचार केला नव्हता. इतका विश्वास होता तुझ्यावर एक दिवस ही स्थिती बदलेल किंबहुना तु बदलशील अशी स्थिती व खात्री होती. पण ती व्यर्थच

ठरली. जीवनाचं वाळवंट झाल्यावर तुझ्या पाऊलखुणा कश्या? जणु आता त्यातही वादळ आलेलं. वेड्यासारखं भरभरून प्रेम केलयं मी तुझ्यावर पण माझ्या ह्दयाच आर्त टाहो आलाच नाही. का तु जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलयं. एका क्षणात सुनामी येऊन सर्वकाही निघुन गेलयं आणि आता विश्वास वेगळा झाला. तु आयुष्यात येताच मी काही हळवी स्वप्न बघीतली. त्या स्वप्नांचा पार चुराडा केलास. कधी सुख कधी दुख त्यांना जीवनाच्या प्रवाहात लगेच धरायचं नव्हतं. आता ते कोमेजलेलं स्वप्न फुल म्हणून फुलंले. कधी शक्य होतील याची आस नाही. प्रेम हा इतका जिव्हारी लागतं तेव्हाच कळतं. तरीही ते सहन करून वेड्याप्रमाणे जगत आहे. तेव्हा एका अंधुक आशेवर तीही आशा हळुहळु मावळली. कानी एक वाक्य पडलयं सर्वस्व गमविण्यासाठी एक प्रकारचं स्वातंत्र असतं. ही गोष्ट खरी असेलही? पण खरं सांग सर्वस्व गमावल्यावर येणारं स्वातंत्र्य काय कामाचं? त्याची किंमत कवडीमोलाची नाही कायं?

लक्ष होते तिचेच  
मार्गही तिचेच  
एकटा होतो मी  
संपूर्ण जग तिचेच  
सोबत करण्याचा विचार तिचाच  
आज मी एकटा आहे  
मन सतत प्रश्न करतो  
लोकं तर तिचेच होते  
मग देवही तिचाच कां?

# आयुष्य

आयुष्य हे खुप सुंदर आहे  
सोबत कोणी नसलं तरी  
एकट्यानेच तो फुलवत राहा  
वादळात सगळचं वाहून गेलं  
म्हणून रडत बसू नका ।  
वेगळं असं माझ्यात खास नाही  
असं म्हणून उदास होऊ नका ...  
मृगाकडे कस्तुरी आहे, फुलात गंध आहे  
माझ्याकडे काय आहे, असं म्हणून रडू नका ...  
अंधाराला जाळणारा सुर्य  
तुमच्यातही लपला आहे ।  
आव्हान करा त्या सुर्याला ...  
मग उगवेल तो तुमच्या आयुष्यात  
एक नविन क्षितीज होऊन !  
मग रोजचं उगवेल एक नविन सकाळ ...  
उत्साह ध्येयाने मारून म्हणून म्हणतो  
आयुष्य खुप सुंदर आहे  
सोबत कुणी नसेल तरी  
एकट्यानेच तो फुलवत राहा...

कु.निकीता विलास पांडे  
बी.कॉम.भाग - ३

# आईचा धडा

कु.कांचन सुनिल धानोरकर
बी.कॉम.भाग - ३

वडीलांच्या निधनानंतर मुलाने आईला वृद्धाश्रमात ठेवण्याचा निर्णय घेतला. अधुनमधुन तो त्या ठिकाणी आईला भेटायला जात असे. असे अनेक वर्षे चालु होते. एके दिवशी वृद्धाश्रमातून त्याला फोन आला की तुमच्या आईची प्रकृती गंभीर आहे आणि तुम्ही लगेच त्यांना भेटायला या.

तो तातडीने वृद्धाश्रमात पोहोचला. आईची प्रकृती गंभीर होती. ती जणू मृत्यूशय्येवर होती. तो म्हणाला आई मी तुझ्यासाठी काय करू? आई म्हणाली वृद्धाश्रमात सगळीकडे पंखे बसव येथे काही पंखा नाही. आनखी एक म्हणजे एक रफ्रिजरेटर आणून ठेव कारण यात अन्न चांगले राहील. मी कित्येकवेळा काही न खाताच उपाशी झोपले आहे.

मुलाला आश्चर्याचा धक्का बसतो. तो म्हणतो, इतके दिवस तु काहीच मागीतले नाहीस आणि आता तु मला हे सगळे कां सांगत आहेस? आई म्हणाली, असे बाळा भयंकर उकळत असतांना आणि वेदना होत असतांना विना पंख्याचे मी दिवस काढले पण तुझी मुले तुला वृद्धाश्रमात पाठवतील तेव्हा तुला हे सगळे कसे काय सहण होणार? याचीच मला चिंता वाटत आहे! ही अगदी सध्याची सत्य परिस्थिती आहे.

## आमची ही

(वात्राटिका)

बस होती कात्रज ते धनकवडी
गर्दी सुद्धा नेहमीचीच
बसायला तर जागाच नाही
माझी तेवढी पुण्याई नाही!
बस मध्ये एक चेहरा ओळखीचा
माझ्याकडे पाहुन सारखा हसायचा
काही केल्या नाव आठवेना
ओळख दिल्याशिवाय मला रहावेना!
गालाला पावडर, ओठावर लाली
केसाचा बॉब कट आणि कपडे ढीली ढीली
आता ओळख पटली माझीच मला लाज वाटली
अहो, ही तर आमची ही होती
नुकतीच ब्युटी पार्लर मधुन आली होती!!

योगेश जी. उईके
बी.ए.भाग - २

# मुल्य जपणारा व्यक्तीमत्व : नारायण मूर्ती

कु.पायल भोयर
बी.कॉम.भाग - ३

इंफोसिस ही जगप्रसिद्ध सॉफ्टवेअर कंपन्यापैकी एक या कंपनीचे जनक श्री नारायण मूर्तीच्या आयुष्याची कथा ही खरोखर दंतकथा वाटेल अशीच आहे. त्यांच्या आयुष्याची कथा आत्मसात करण्यासारखी आहे. कारण एखादी व्यक्ती इतक्या उच्च स्थानावर कशी पोहचू शकते हे नारायण मूर्ती ह्या व्यक्तीच्या आयुष्यावर नजर टाकली तर समजू शकतं. त्यांच्या वाट्याला अनंत अडचणी येऊनही ते यशाच्या शिखरावर कसे पोहचले हे समजू शकेल.

नारायण मूर्ती जन्म २० ऑगष्ट १९४६ मध्ये म्हैसुर संस्थानातल्या कोलार जिल्ह्यातल्या चिटलगट्टा गावाच्या गरीब ब्राह्मण कुटूंबात झाला. त्यांचे वडील नागावारा रामाराव एका हायस्कूलमध्ये शिक्षक होते. ते गणित आणि जीवशास्त्र शिकवत असत. त्यांना आठ मुलं होती. पाच मुली आणि नारायण मूर्तींना धरून तीन मुलगे. पैसा मिळवण्यासाठी काम करणारे ते एकटेच, त्यामुळे एवढ्या मोठ्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करणे खूपच अवघड होत असे. तरी पण स्वत: शिक्षक असल्यामुळे रामारावांना हे ठाम पटलेलं होतं की चांगल शिक्षण मिळविण हीच महत्वाची गोष्ट आहे. त्यांचे वडील नेहमी म्हणायचे की, आयुष्यातल्या अडचणीवर मात करण्याचा एकमेव उपाय चांगल शिक्षण हाच आहे. मूर्तीच्या मनाने खूप पैसे मिळवून चैनीचं आयुष्य जगण्यापेक्षा नीट अभ्यास करून ह्या जगाबद्दल ज्ञान मिळविण जास्त चांगल आहे. माणसानं स्वार्थीपणा न करता समाजाच्या कल्याणाचा विचार करावा. कधीही खोटं बोलू नये, नेहमी सत्याची कास धरावी आणि कुठलाही त्याग करायला तयार असावं. शाळेच्या अभ्यासात ते सुरूवातीपासूनच अतिशय हुशार होते. त्यांना आय.आय.टी.मध्ये प्रवेश मिळवायचा होता म्हणून शाळेतून बाहेर पडल्यावर ते त्या अभ्यासाला लागले. प्रवेश परिक्षा पास झाली. निकाल लागला. हजारो परीक्षार्थीपैकी पास होणाऱ्यांमध्ये त्यांचा नंबर सातवा होता. परंतु पुरेसं अधिक बळ नसल्याने त्यांना आय.आय.टी.मध्ये प्रवेश घेता आला नाही. आणि नाईलाजाने त्यांनी इंनिनिअरींग कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. तिथेही पदवी परीक्षेत पहिल्या नंबरने पास झाले. त्यानंतर स्कॉलरशिप मिळाल्यामुळे ते कानपूरच्या आय.आय.टी.मध्ये एम.टेक. करू लागले.

मूर्तीच्या मनाने फक्त आपण हुशार असणे एवढंच महत्वाचं नाही. पण इतरांबरोबर समन्वय साधून सर्वांसोबत एकजुटीन चांगलं काम करणं, हे जास्त महत्वाचा आहे.

१९६९ मध्ये त्यांना जेव्हा एम.टेक. ची डिग्री मिळाली तेव्हा ज्या चार कंपन्यांनी नोकरी देऊ केली, त्या सगळ्या मोठ्या प्रतिष्ठीत कंपन्या होत्या. हिंदुस्तान मशीन टूल्स (एच.एम.टी.) जी मनगटी घड्याळ बनवणारी नामांकित कंपनी आहे. सरकारी कंपनी इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया हे मूर्तीसाठी मोठी संधी होती. सगळ्या कंपन्या पगारही चांगलाच देऊ शकत होत्या. पण त्यांनी अहमदाबादच्या इंडियन इंस्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट मध्ये नाकरी करण्याचे ठरवले. आय.आय.एम.मध्ये जो पगार मिळणार होता, तो वर

लिहिलेल्या चार कंपन्यापेक्षा कमी होता. परंतु मूर्तींना तिथे खूप चांगल अनुभव मिळण्याची शक्यता होता. कारण औद्योगिक संस्थांच्या तुलनेत शैक्षणिक संस्थांमध्ये नव्या गोष्टी, नवे प्रयोग करायला जास्त संधी दिली जाते.

ते जीवनाच्या प्रत्येक क्षणी काही नवीन शिकण्यास तत्पर असायचे. ते कधीही यशाच्या बाबतीत आत्मसंतुष्ट नसायचे आणि म्हणूनच ते इतके वर पोहचू शकले.

मूर्तीचे मत असे होते की, शिक्षण म्हणजे पाठ्यपुस्तके घोकून परीक्षेच्या वेळी ते सर्व लिहून काढणे नव्हे. त्यांच म्हणणं होत, की जेव्हा काही प्रश्न उभा होईल तेव्हा पाठ्यपुस्तकातुन मिळविलेल्या ज्ञानाबरोबर आपल्या अनुभवाचा उपयोगही केला पाहिजे. इंफोसिसची सुरूवात सात जणांनी एका छोट्याशा खोलीत केली होती. आज भारताच्या प्रत्येक मुख्य शहरात आणि अनेक देशांमध्ये कंपनीची ऑफिसेस आहेत. त्यामध्ये १००००० हून जास्त कर्मचारी काम करीत आहेत.

मूर्ती म्हणतात, की इंफोसिसचं भविष्य देशाच्या तरूण पिढीवर अवलंबून आहे. ह्या विचाराला धरून आणि इंफोसिसच्या दूरगामी विकासाचा विचार करून मूर्तींनी निर्णय घेतला होता की, पुढील पिढीला वाव देण्यासाठी काहीतरी केलंच पाहिजे. नवीन व तरूण प्रतिभा पुढे यावी. ह्यासाठी ३१ मार्च २००२ ला त्यांनी इंफोसिसच्या सी.ई.ओ. (चीफ एक्झीक्युटिव्ह ऑफिसर) पदाचा राजीनामा दिला होता.

आयुष्यात ध्येयापर्यंत पोहचण्यात आनंद नसतो. तर नवनवीन ध्येयांकडे वाटचाल करत राहण्यात असतो. मूर्तीच्या म्हणण्याप्रमाणे सतत यशाच्या शिखरावर वाटचाल करीत रहावी. दमून किंवा संतुष्ट होऊन थांबू नयेत.

# स्वप्नातले घरटे

स्वप्नातले घरटे स्वप्नातच मोडले
सकाळ व्हायच्या आधीच
चिमनीचे घरटे सोडले
चिमनीला न विचारताच
चिमन्याने घरटे बांधले
येणार ती घरट्यात या भ्रमात दिवस काढले
स्वप्नातले रंग चिमनीचे चित्र बनवित होते
होकार मिळवून आली घरट्यात
स्वप्न चिमन्यांचे सजवीत होते
प्रत्यक्षात चिमना जातो विचारण्यास
घरट्यात राहण्यास येते?
विचारण्याआधीच चिमन्याची हिंमत खचते
दुरूनच चिमनीला मन भरून पाहतो
एकवेळ तरी वरून पाहिलं
नजरेच्या तिच्या वाट बघतो
चिमनी येते जवळ चिमन्याला हळुच सांगते
जड हृदयाने चिमनापण ऐकते
मी जाणार लग्न माझे ठरले
चिमना मनातच म्हणतो
आता काहीच न उरले
चिमनीचे डोळ्यातले घाव
चिमना टिपुन घेतो
रंगवलेल्या स्वप्नांचे गाव
न मांडण्याचा पश्चाताप होतो
आठवणी जुन्याच जपून ठेवल्या चिमन्याने
नव्या चिमनीचा शोध घेतो
चिव चिव गोऊन गाने

कु.अश्विनी डी. तागडे
बी.ए.भाग - १

# व्यवसायाचे दुष्परिणाम ; एक मिमांसा

कु.प्रणाली सेवतकर
बी.कॉम.भाग - २

मानवी आरोग्याला बाधित करणाऱ्या आजारांची अनेक कारणे असतात. हवेतून पसरणारे सर्दी-खोकला, फ्लू, स्वाईनफ्लू, खाण्या-पिण्यातून पसरणारे उलट्याजुलाब, टायफॉईड, कावीळ, जंत ; स्पर्शातून पसरणारे स्पर्शजन्य आजार ; असुरक्षित शारीरिक संबंधातून पसरणारे एचआयव्ही एड्स, हिपॅटायटिस बी असे अनेक आजार विविध मार्गानी मानवी शरीरावर आक्रमण करतच असतात. काही आजार चुकीच्या जीवनशैलीतून निर्माण होतात. उदा. मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, स्थूलत्व वगैरे. मात्र काही आजार पोटापाण्याच्या व्यवसायाशी निगडीत असतात यांना व्यवसायजन्य आजार म्हणतात. आदिमानवाने शिकार करायला सुरूवात केल्यापासून हे व्यवसायजन्य रोग सुरू झाले. त्यानंतर शेती सुरू केल्यावर त्यात भर पडत गेली. औद्योगिक क्रांतीनंतर लहान-मोठे कारखाने निर्माण झाले. त्या काळात व्यवसायजन्य रोग, वैद्यकक्षेत्राच्या लक्षात येऊ लागले. आजच्या ग्लोबलाझेशन जमान्यात वेगाने निर्माण झालेले राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील कारखाने आणि संगणकीय क्षेत्रातील नावीन्यपूर्ण उद्योगांमुळे या निरनिराळ्या व्यवसायातील हानिकारक घटक आणि आजार यांचा संबंध पक्का झाला.

व्यावसायिक दुष्परिणामाचा पद्धतशिरपणे अभ्यास करून त्यारव उपया शोधणारे ऑक्सुपेशनल हेल्थ किंवा व्यवसायजन्य आरोग्य हे आजमितीला एक मान्यवर शास्त्र झाले आहे. उद्योगधंद्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या आरोग्याची काळजी घेण्यानिमित्ताने अनेक कायदेकानून सुद्धा झालेले आहेत.

**भारताची परिस्थिती :**

तेहत्तीस लाख चौरस किमी क्षेत्रफळ असलेला आणि सव्वा अब्जापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या आपला भारत, व्यवसाय धंद्याच्या उत्कर्षावर जागतिक महासत्ता होऊ इच्छितो आहे पण आपल्या देशातील ७२% जनता अजूनही खेड्यात किंवा छोट्या गावात राहणारी आहे आणि त्यांच्यासाठी शेती हाच व्यवसाय आहे. इ.स.२०११ च्या आकडेवारीनुसार आपल्या देशात सव्वातीन लाख कारखाने सरकार दरबारी रजिस्टर्ड आहेत. त्यातले सुमारे छत्तीस हजार पाचशे कारखाने आरोग्याला धोकादायक आहेत. या सर्व कारखान्यात एक कोटींहून अधिक कामगार काम करतात. पण दुर्देवाने त्यातले बहुसंख्य कामगार असंघटित आहेत. या कामगारांत ६८% पुरूष आणि ३२% महिला आहेत.

**रासायनिक प्रदूषण :**

औद्योगिक वातावरणातील रासायनिक प्रदुषणाचा परिणाम व्यवसायजन्य विकारांच्या वाढीला सर्वात जास्त कारणीभूत आहे. रसायनयुक्त धूर, वाफा, उपद्रवकारण वायू, सूक्ष्म फवारे, सूक्ष्मचूर्णाची धूळ यासारख्या विविध स्वरूपातल्या पदार्थाचा कामगारांशी संपर्क होतो. त्यामुळे त्वचा, डोळे, श्वसनमार्ग यांचे विकार ; अन्नाच्या व पाण्याचा संदूषणाने पचनमार्ग यावर अनिष्ट परिणाम ; रासायनिक

पदार्थाच्या सततच्या संपर्कामुळे फुफ्फुसे, यकृत, मेंदू यांचे कर्करोग उद्भवतात. ॲसिड अंगावर उडणे, विषारी वायू फुफ्फुसात जाणे अशा घटना ताबडतोब परिणाम करतात. तर याउलट फॉस्फरससारखी काही रसायने शरीरावर हळूहळू परिणाम करतात.

### सूक्ष्म धूलिकण :

पिठाच्या गिरणीमध्ये श्वासमार्गात पीठ जाणे, कापड गिरणीत कापसाचे तंतू फुफ्फुसात जाणे, हळदीच्या तसेच मिरचीच्या कारखान्यात श्वसनात ते पदार्थ जाणे. यामुळे फुफ्फुसांना सूज येऊन दमा खोकला आणि सिओपीडीचा आणि खडीच्या कारखान्यात सिलीकॉसिसचा त्रास होतो.

### धातू :

आपल्या शरीरामध्ये जस्त, मॅगेनीज, मॅग्नेशिअम अशा अनेक धातुची सुक्ष्म प्रमाणात आवश्यकता असते. या धातूंच्या चयापचयासाठी शरीरात विशिष्ट प्रथिनांची निर्मिती होत असते. या प्रथिनांशी इतर धातूंचे अणू बांधले गेल्यास काही गंभीर विकार होतात. त्याचप्रमाणे आवश्यक धातुंचे शरीरातील प्रमाण जास्त झाल्यानेदेखील विषारी परिणाम होतात. रक्तामध्ये त्या धातूची सुरक्षीत पातळी आणि धोकादायक पातळी यामधील फरक फार थोडा असल्याने, तसेच धातुचे उत्सर्जन शरीरातून मंद गतीने होत असल्याने धातूचे दिर्घकालीन विषारी परिणाम दिसून येतात. यामध्ये यकृत आणि मूत्रपिंडे निमाकी होऊ शकतात.

### किरणोत्सर्ग :

क्ष-किरण, इन्फ्रारेड किरण, गॅमा किरण, लेसर यासारखे विशेष प्रकारचे किरणोत्सर्ग वापरणाऱ्या प्रयोग शाळा, निदान व उपचार केंद्र, अणुउर्जा केंद्र यामध्ये काम करणाऱ्या व्यक्तींना अशा गोष्टीपासून धोका असतो.

### शारीरिक हालचाल :

ऑफिसमध्ये संगणकासमोर तासनतास बैठे काम केल्यामुळे पाठ, खांदे, कंबर दुखणे, डोळ्यांना त्रास होणे, वजनवाढ आणि त्या अनुषंगाने होणारे जीवनशैलीचे आजार होतात.

### उष्णता :

ओतकामाच्या भट्ट्या, धातुनिर्मीतीचे कारखाने, खाणी यांच्या परिसरातील उष्णतेमुळे सारखा घाम येऊन शरीरातील क्षार कमी होतात. त्यामुळे थकवा, अशक्तपणा, गरगरणे, पेरणे येणे, डोकेदुखी अशी लक्षणे दिसतात. उन्हाळ्याची तिव्रता जास्त असलेल्या प्रदेशांमध्ये उन्हात काम करणाऱ्या किंवा कामासाठी दिवसभर हिंडावे लागणाऱ्या कर्मचाऱ्यांना उष्मघाताचा त्रास होऊ शकतो. यामध्ये क्षार आणि पाणी खूप कमी होऊन, शरीराचे तापमान - नियंत्रण करणारी यंत्रणा विस्कळीत होते. खूप ताप येतो. शरीरातील पाण्याचे प्रमाण खूप घटते. त्यामुळे रक्तदाब कमी होणे, रक्ताभिसरण न होणे असे त्रास संभवतात. कान, डोळे, श्वसनमार्ग आणि उघडीत्वचा यावर अनिष्ठ परिणाम होतात.

### मानसिक दुष्परिणाम :

कामाच्या ठिकाणी मानसिक ताणतणाव सतत राहिल्याने चिंता, नैराश्य, निद्रानाय, भूक न लागणे, मानसिक स्थितीत किंवा मुडमध्ये बदल असे कायमस्वरूपी विकार जडू शकतात. याच कारणामुळे व्यसनाधिनता वाढू शकते. वाहनचालकांचा व्यवसायात अपघाताचा धोका असल्यामुळे मानसिक ताणतणाव जास्त असतो.

इत्यादी दुष्परिणाम व्यवसायाचे आहेत.

# ई-कॉमर्सच्या क्षेत्रातील करिअरवाटा

राहुल दे. पेरोडिया
बी.कॉम.भाग - १

आजकाल ई-कॉमर्स ची बरीच चलती आहे. जिकडे पहावं तिकडे पेपरलेस ट्रान्झॅक्शनना महत्व प्राप्त झालं आहे. आपणही आजकाल पत्रांऐवजी एस.एम.एस., पैशांऐवजी एटीएम किंवा क्रेडिट कार्ड, ऑनलाईन गप्पा, बुकींग अशा कितीतरी गोष्टींना सरावलो आहोत. त्यामागे एक मोठी यंत्रणा काम करत असते. तिथे काम करायचं असेल तर मात्र त्यातल्या प्रशिक्षणाशिवाय पर्याय नाही. खरं तर नव्या युगाची ही ओळख आहे. ई-कॉमर्स ची रोगजाराच्या दृष्टीने व्याख्या करायची झाली तर तो इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या माध्यमातून केला जाणारा व्यापार आहे, असं म्हणता येईल. जगात सगळीकउे त्याची स्वीकृती झालेली आहे. भारत तर होणारी महासत्ता म्हणून ओळखली जात असल्याने आपल्याकडे ई-कॉमर्स ला जरा जास्तच महत्व आलं आहे. व्यापाराच्या दृष्टीने त्याचं महत्व अनन्यसाधारण आहे. आज बरेच व्यवहार ई-कॉमर्सच्या माध्यमातूनच होतांना दिसतात आणि त्याला विश्वासार्ह्यताही मिळू लागली आहे. व्यापाराच्या दृष्टीने ई-कॉमर्स ला पर्याय नाही. शेअर मार्केटपासून रोजच्या किराणा मालाच्या खरेदीपर्यंत कोणतीही गोष्ट आता ई-कॉमर्स च्या मार्फत केली जाते.

आज अगदी लहानपणापासून सगी यंत्र हाताळायला मिळालेल्या मुलांना ई-कॉमर्सचा बाऊ वाटतच नाही. उलट रोजगाराच्या नव्या संधी देणारा तो एक चांगला पर्याय झाला आहे. आता मोबाईल, कॉम्प्युटर, एटीएम, क्रेडीट कार्ड, ऑनलाईन बुकींग, सोशन नेटवर्कींग अशा कितीतरी गोष्टी आपण रोज करतच असतो. म्हणजे ई-कॉमर्सचा आपल्या जीवनात कोठे ना कोठे शिरकाव झालेलाच आहे. हे क्षेत्र म्हणजे माहितीचा समुद्र आहे. त्याच पोहण्यासाठी ज्ञानाची हांडीच हवी. ई-कॉमर्स ही नव्या पिढीची भाषा झाली आहे. त्यात सहाजिकच रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होत आहेत. नव्या तंत्रज्ञानाची ओळख असणाऱ्या आणि त्यातच रस असणाऱ्या अनेकांना त्यात रोजगाराच्या अनेक संधी मिळतात. त्यात तुम्हाला नक्की कोणत्या क्षेत्रात जायचं आहे हे मनाशी पक्कं असेल तर दिशा ठरवणं अगदी सोपं आहे. भारतात कॉम्प्युटर वापरणाऱ्यांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे ई-कॉमर्सलाही मागणी येऊ लागली आहे. इंटरनेटच्या सुविधा देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचल्याने ई-कॉमर्स च्या चलनवलनाला चांगलाच जोर आला आहे. परदेशी कंपन्याचं वाढतं भांडवल आणि सरकारी प्रोहोत्सान यामुळेही ई-कॉमर्स ला चांगले दिवस आले आहेत. भारत सरकारनेही ई-कॉमर्स द्वारा केल्या जाणाऱ्या व्यवहारांना कायदेशीर मान्यता देऊन त्याची व्याप्ती वाढविली आहे.

ई-कॉमर्सची पदवी घेतल्यानंतर तुम्ही अनेक प्रकारे कारकिर्द घडवू शकता. त्यात वेबसाईट डिझाईन आणि डेव्हलपमेंट, वेब प्रोग्रामिंग आणि एप्लीकेशन डेव्हलपर, डाटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर, वेब मास्टर अशा अनेक संधी आहेत. वेब डिझाइनर म्हणून काम पाहतांना वेबसाईटचं डिझाइ करणं, ग्राफिक्स, एनिमेशन यातून वेबसाईट आकर्षक बनवनं ही कामं करता येतात. त्याला जोडीला कोरल ड्रॉ, फोटोशॉप, मायक्रोमिडीया आदींची जोड असेल तर कमी वेळात जास्त प्रगती करता येईल. कंटेट डेव्हलपर म्हणूनही तुम्ही काम पाहू शकता. आजकाल वेबसाईटवर जो मजकूर छापला जातो

त्याला सजवणं, प्रस्तूत करणं, त्याची जमवाजमव करणं या गोष्टींनाही फार मागणी आहे. मात्र त्यासाठी तुमचं इंग्रजीचं ज्ञान चांगलं असायला हवं. वेब प्रोग्रॅमर आणि एप्लिकेशन याला सध्या सगळ्यात जास्त मागणी आहे. कंपनीच्या प्रोडक्टला वेबवर सादर करणं ही एक कला आहे. हे काम ते करतात. त्यासाठी एच.टी.एम.एल., जावा, स्क्रीप्ट यांची त्याला चांगली माहिती असणं गरजेचं आहे. सिस्टम डिझाइन, डेव्हलपमेंट आणि मेन्टेनन्स यांची काळजी घेणारे वेब ॲडमिनिस्ट्रेटर यांनाही चांगली मागणी आहे. शिवाय वेबसाईट चालवण्याची सगळी जवाबदारी आपल्या खांद्यावर घेणाऱ्या वेब मास्टरची पोझिशनही महत्वाची असते.

या सगळ्या शिक्षणानंतर एखाद्या चांगल्या सरकारी किंवा खाजगी कंपनीत अगर मल्टीनॅशनल कंपनीतही चांगल्या पगाराची नोकरी मिळणं अजिबात अवघड नाही. हे अभ्यासक्रम भारतातल्या सगळ्या मान्यताप्राप्त विद्यापीठातून शिकवले जातात. कोर्सची निवड करतांना मात्र तुमची आवड लक्षात घेणे गरजेचे आहे.

ई–कॉमर्समध्ये प्रवेश घेण्याचे अनेक मार्ग आहेत. त्यासाठी एकच असा सर्वमान्य कोर्स नाही. बारावी झालेल्या विद्यार्थ्यांना ई–कॉमर्सच्या डिप्लोमाला प्रवेश मिळू शकतो. त्यात काही महत्वाचे कोर्स पुढीलप्रमाणे –

ई–कॉमर्स ॲप्लीकेशन प्रोग्राम – सर्टीफिकेशन कोर्स इन वेब ॲन्ड ई–कॉमर्स टेक्नॉलॉजी, सर्टीफिकेशन कोर्स इन वेब ॲन्ड इंटरनेट प्रोग्रामिंग, बॅचलर ऑफ ई–कॉमर्स, एमबीए इन ई–कॉमर्स असे पर्यात यात उपलब्ध आहेत.

ज्यांनी पदवी परिक्षा पूर्ण केलेली आहे त्यांना एकदम ई–कॉमर्स हा विषय घेऊन एमबीए करता येते. त्यात मास्टर इन ई–कॉमर्स, मास्टर ऑफ इंजिनिअरींग इन ई–कॉमर्स, मास्टर ऑफ सायन्स इन इंफरमेशन टेक्नॉलॉजी ॲन्ड ई–कॉमर्स, मास्टर ऑफ इंफरमेशन टेक्नॉलॉजी इन ई–कॉमर्स, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन ई–कॉमर्स एप्लीकेशन असे अनेक पर्याय उपलब्ध आहेत.

# अस्सल मैत्री जीवनपुष्प ...

फुले शिकवतात ...
गुलाब सांगतो,
येता–जाता रडायचं नसतं,
काट्यात सुद्धा हसायचं असतं,
रातराणी म्हणते,
अंधाराला घाबरायचं नसतं,
कोळोख्यातही फुलायचं असतं
सदाफुली सांगते,
रूसुन रूसुन राहायचं नसतं,
हसून हसून हसायचं असतं,
बकुळी म्हणते,
सावळ्या रंगाने हिरमुसायचे नसतं,
गुणाच्या गंधाने जिंकायचं असतं,
मोगरा म्हणतो,
स्वत:च्या बडेजावपणा सांगायचा नसतो
सद्‌गुणांचा सुगंध मैलावरून ही येतो,
कमळ म्हणतो,
संकटात चिखलात बुडायचं नसतं,
संकटात बुडून फुलायचो असतं.

आकाश डी. लक्षणे
बी.ए.भाग - ३

# यशाचा फंडा

हिना पी. गायनेर
बी.एस्सी.भाग - १

प्रत्येकांना आपल्या इवल्याशा घराट्यात सुखद वारा घेण्यासाठी यश हवं असतं. कुणाला यशह हे मोठं हवं असत तर कुणाला छोटं. पण यशाचे दाणे पदरी पडावे हीच प्रत्येकांची आशा असते. त्यासाठी त्याच्या मागे सतत धावावं लागतं.

जेव्हा आपले विरोधी जरी धावुन धावुन थकले तरी आपल्याला विसावा घ्यायचा नसतो.

मी वाचलेल्या यशस्वी कथांचा अनुभव शेअर करतांना मी सांगते की,

Ever successful person
has a painful story
every painful story
has successful ending
Accept the pain
and get ready to success

यश काही साध नसतं त्यासाठी दु:खही सहन करावं लागतं. अंगात नसानसात भरून जिद्द आणि चिकाटी असली ना तर यशाचा पायऱ्या लवकर चढता येते. पण त्या पायऱ्यावर जरी काटे असली तरी त्यावरून चालण्याची हिंमत करावी लागते. पण काटे असली की भिऊन जायचे नसते. याचाच अर्थ असा की यशाच्या रस्त्यावर कितीही संकटे आली तरी उगमगुन जायचे नसते. त्यासाठी संघर्षही करावा लागतो.

There is no royal road
to success
but after success
every road becomer royal

Best wishes for those who belive in struggle

हा आहे खरा यशाचा फंडा आहे. माझ्या मते यशाच्या शिखरावर जरूर चढा.

पण लोकांनी आपल्याला पाहावं म्हणून नाही, तर आपल्याला उंच शिखरावरून जग पाहता यावं म्हणून ...

## पणती

सांजेला पणती तुळशीजवळ लावली
अचानक का ही पापणी ओलावली ...
जडवलेल्या पापण्या उचलल्यावर
डोळ्यांच्या काठावर अश्रूंचा थर
काळवलेलं आभाळ धरलं कवेत
मनसोक्त रडावसं वाटलं त्यांच्या कुशीत
डबडबलेली काठ बांध सोडाया लागली
कंठ फुटून स्वर निघण्यास घाबराया लागली
हातातली अगरबत्ती अशी थरथरली कां?
श्लोक म्हणतांना जीभ मध्येच अडखडली कां?
मग घरट्यांकडे परतणाऱ्या पाखरांकडे पाहून
डोळ्यांच्या धारा गेल्या स्थिराऊन
सांजेच्या दाट काळोखात! पणती तेवत होती ...
तुझे आई-बाबा येतीलच आता
हेच मी मला सांगत होती...

कु.प्रिती चव्हाण
बी.एस्सी.भाग - १

# हवामानातील प्रदुषक घटके

कु.पुनम आर. भंडारी
बी.ए.भाग - ३

**प्रदुषक घटके :**

नैसर्गिक हवेतील जे पदार्थ अथवा घटक मानवी, प्राणी, पक्षी, वनस्पती, उपयुक्त, जंतू यांच्या आरोग्यास व जीवनास हानिकारक आहेत. तसेच जे हवामान बदलास कारणीभूत आहेत त्यांना प्रदुषक घटक असे म्हणतात.

**सल्फर डायऑक्साईड :** कोळखात असणारे तसेच रॉकेलमध्ये असणाऱ्या गंधकाचा जेव्हा कोळसा जळतो तेव्हा सल्फरचेही ऑक्सिडेशन होते व सल्फर डायऑक्साईड तयार होतो. सल्फर डायऑक्साईड पाण्यात लवकर विरून जातो. जर हवेत सल्फर डायऑक्साईडचे प्रमाण जास्त झाले व त्या काळात पाऊन पडला तर त्याचे पाण्यामध्ये मिसळून सल्फ्यूरिक आम्ल तयार होते व यालाच आम्लधर्मी पाऊस म्हणतात. आम्लधर्मी पावसाने पिकांवरती मोठ्या प्रमाणावर परिणाम होतो. जमीन आल्मयुक्त होते व हळूहळू नापीक बनते. असल्या पावसाने गंधकाची इमारतींच्या मटेरियलवर रासायनिक क्रिया होऊन इमारतींचे आयुष्य कमी होते. सल्फर डायऑक्साईड जेव्हा श्वसनाद्वारे नाक पुड्यांमध्ये जातो तेव्हा श्वसननलिकेतील पेशी सल्फर डायऑक्साईड फुफ्फुसापासून पोहोचण्यापूर्वी कफातील पाण्यात विरून टाकतात. जर त्याचे प्रमाण जास्त झाले तर नलिकेत अजून जास्ती कफ होतो व सर्दी होते.

**नायट्रोजन ऑक्साईड व डायॉक्साईड :** अतिउच्च तापमानावर (१००० अंश सेल्शियस अथवा त्यापेक्षा जास्ती) जेव्हा ज्वलन होते त्यावेळेस हवेतील नायट्रोजनचेही व नंतर डायॉक्साईड बनते. मुख्यत्वे दुचाकी - चारचाकीच्या इंजिनमध्ये तापमान १००० पेक्षाही जास्त असते त्यामुळे नायट्रोजन ऑक्साईडची निर्मिती होऊन वाहनांच्या धुराड्यांमार्फत वायुप्रदुषण होते. नायट्रोजन डायॉक्साईड सुद्धा सल्फर डायॉक्साईड प्रमाणे श्वसननलिकेत प्रवेश करतो. परंतु याची पाण्याची विरण्याची क्षमता कमी असते व तो बराचसा फुफ्फुसापर्यंत पोहचतो. यामुळे जास्तीत जास्त कफनिर्मिती होऊन सर्दी होते. इतर लक्षणांमध्ये त्वचा कोरडी पडणे. डोळे चुरचुरणे असे प्रकार घडतात.

**ओझोन :**

ओझोन शरीरास चांगला असतो. हा एक चुकीचा समज आहे. ओझोनमध्ये ऑक्सिजनचे तीन अणू असतात. यातील तिसरा अतिशय आक्रमक असतो व मिळेल त्या गोष्टींचे ऑक्सिडेशन करण्याचा प्रयत्न सातत्याने करत असतो. ओझोनची खरी गरज वातावरणातील वरच्या भागात आहे. तिथला ओझोन सूर्यापासून येणाऱ्या हानिकारक किरणांपासून आपले संरक्षण करतो. परंतु आपल्या नजीकच्या वातावरणातील ओझोन एक आक्रमक रसायनाचे काम करत असतो. ओझोन श्वसन नलिकेत कफमध्ये अजिबात न विरघळता सरळ फुफ्फुसांपर्यंत जाऊन पोहचतो व फुफ्फुसांतील पेशींवर अतिशय संहारक पद्धतीने हल्ला चढवतो. यामुळे जेव्हा हवेत ओझोनचे प्रमाण जास्त असते तेव्हा छातीत कळ

येण्यासारखे प्रकार घडतात. ओझोनच्या सातत्याच्या माऱ्यामुळे कालांतराने फुफ्फुसे दुर्बल होऊन दम्यासारखे रोग वाढीस लागतात.

## व्होलेटाईल ऑरगॅनिक कंपाऊंड

विविध रसायने व रासायनिक उत्पादने यांच्या वापराने या उत्पादनांचे बाष्पीकरण होते व व्हीओसी तयार होतात. यातील काही घटक हे मानवी आरोग्यास सरळपणे घातक असतात तर काही सुरक्षितपण असतात. बहुतांशी व्हीओसींचे सूर्यप्रकाशात ओझोनमध्ये रूपांतर होऊन जाते व ओझोन अंतत: घातक प्रदुषक घटकाचे काम करतो. पेट्रोलपंपावरील गाडी भरतांना ऊडणारे पेट्रोल, घराला रंग देतांना थिनर व ऑईलपेंटचा वापर इत्यादी गोष्टी वातावरणातील व्हीओसी वाढवतात.

कार्बल मोनॉक्साईड : आरोग्यास अत्यंत घातक असा हा वायू अपूर्ण ज्वलनाने तयार होतो. विटभट्या, छोटे छोटे तसेच मध्यम व मोठे वीज निर्मितीसंच, वाहनांचीया इंजिने यामधून हा बाहेर पडतो. आपल्या रक्तांमध्ये ऑक्सिजन वाहण्याचे काम करणारे हिमोग्लोबिनमध्ये ऑक्सिजनऐवजी मिसळून जातो व शरीरातील सर्व भागात पोहचतो. त्यामुळे हा वायु अत्यंत विषारी काही मिनीटे सातत्याने संपर्कात आल्यास मृत्यूही ओढवू शकतो. हे अतिटोकाच्या परिस्थितीत होऊ शकते. परंतु कमी संपर्कात किंवा हवेतील कमी प्रमाणात कार्बन मोनॉस्काईड असल्यास चक्कर येणे, डोके दुखणे, विचार क्षमता अथवा कार्यक्षमता कमी होणे असे प्रकार घडतात.

अतिसूक्ष्म धूलिकण २.५ मायक्रोमीटर पेक्षा लहान आकारमानाचे : हे अतिसूक्ष्म धुलीकरण श्वसनामार्फत फुफ्फुसांत खोलवर जाऊन पोहचतात व फुफ्फुसांच्या रचनेमुळे आतमध्ये दीर्घकालांपर्यत साठून राहतात. हे सूक्ष्मकण विविध प्रकारच्या हानिकारक घटकांनी बनलेले असल्यास रक्तामध्ये मिसळून रक्त प्रदुषित करतात व आरोग्यावर अतिशय घातक परिणाम करतात. वाहनांतून बाहेर पडणाऱ्या धुरांमध्ये अति–अतिसूक्ष्म (नॅनो आकारात) काजळीसारखे कण असतात. हे कण एकत्र येऊन अतिसूक्ष्म कण बनतात व वातावरणातील प्रदूषण वाढवतात. दोन स्ट्रोकवाल्या वाहनांमुळे तसेच डिझेलवर चालणाऱ्या वाहनांमुळे शहरांमध्ये या कणांचे मोठ्या प्रमाणात प्रदुषण होते. भारतातील शहरांमध्ये प्रामुख्याने अतिसूक्ष्म कणांचा प्रादुर्भाव जास्ती आहे.

# प्रेम

प्रेम हे आंधळं असतं
कुणासाठी तरी मन वेडं असतं
प्रेम येतांना फुलातून येतं
पण प्रेमान आवरतांना काट्यातून जायचं असतं...
प्रेमात एकमेकांच्यात हवा विश्वास
एक शरीर तर दुसरा श्वास
प्रेमात एकमेकांच्या दुर रहायचं असतं
दुर राहणे हेच तर खरं प्रेम असतं ...
प्रेम हे नाजूक असतं
प्रेम हे रेशमी धाग्यासारखं असतं
प्रेम म्हणजे दोन मनाचा शोध असतो
पण तरीही प्रेमाला समाजाचा विरोध असतो

भारती रमेश चरपे
बी.एस्सी.भाग - १

# संतसाहित्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन

कु.रिता एस. आत्राम
बी.ए.भाग - २

जनमानसात संतांविषयी जी प्रतिमा बनलेली आहे. ती फक्त भक्तिमार्ग, चमत्कार, आत्मा, स्वर्ग, नरक, पुनर्जन्म, समाधी, भजन, किर्तन, आत्मिक शांती या पुरतीच मर्यादित आहे. ही त्यांच्या कार्याची एक बाजू असली तरी दुसरी बाजू अजुनही पाहिजे तशी लोकांसमोर आलेली नाही. प्रचलित बाजू जनमानसात ठसविण्याचे व रूजविण्याचे काम प्रस्थापित वर्गाने हेतुपूर्वक आपल्या स्वार्थासाठी केलेले आहे. परंतु संत साहित्याचा सखोल अभ्यास केल्यानंतर आपल्याला असे आढळून येईल की, त्या काळात प्रस्थापितांविरूद्ध जाऊन सामान्य लोकांमध्ये जनजागृती करण्याचे महाकठीण कार्य सुद्धा संतांनी केलेले आहे.

संतांनी त्यांच्या साहित्यातून केलेल्या सामाजिक प्रबोधनाची एक हजार वर्षाची परंपरा आपल्याला लाभलेली आहे. प्रबोधनाच्या या परंपरेमध्ये प्राचीन काळात चार्वाक पंथ, महात्मा बसवेश्वर, चक्रधर स्वामी, संत कबीर यांच्यापासून तर महाराष्ट्रीय संत, संत नामदेव, ज्ञानेश्वर, चोखामेळ, सावता माळी, एकनाथ व संत तुकोबाराय यांचा मोलाचा वाटा आहे तर आधुनिक संतांमध्ये कर्मयोगी गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे योगदान महत्वाचे आहे.

महाराष्ट्रात बाराव्या शतकात यादवराजांच्या दरबारी असलेल्या हेमाद्री पंडित नावाच्या पुरोहिताने आपल्या चातुर्वर्ण्य चिंतामणी या ग्रंथात वर्षाच्या तीनशे पासष्ट दिवसात करावयाच्या दोन हजार व्रतांची मांडणी करून ठेवली व मनुस्मृतीच्या कायद्यानुसार त्यांची कडक अंमलबजावणी करण्यास सत्ताधाऱ्यांना भाग पाडले. परिणामी आपला समाज चातुर्वर्ण्यावर आधारलेला, कर्मकांडाचे प्रभुत्व असलेला व जातीभेदाने त्रस्त्र झालेला होता. सामान्य माणसाला कोठलेही अधिकार नव्हते. व्रत-वैकल्ये, तीर्थयात्रा, नवस व श्राद्धविधी, दान-धर्म यामध्ये समाज गुरफटून गेलेला होता. मंत्र-तंत्र, जादूटोना, भुते-खेते, शकुन शुभाशुभ यावर लोकांचा विश्वास बसला होता. हे सर्व टाळण्यासाठी पुरोहितांनी सांगितलेले कर्मकांड, यज्ञ, जप-तप, अनुष्ठान सतत चालत असे. अशा प्रकारे अंध:श्रद्धेच्या गर्तत समाजजीवन बुडाले होते.

अशा स्थितीतून समाजाला बाहेर काढण्याची तळतळ संतांना होती. धर्माचे खरे स्वरूप सामान्य जनतेला दाखवावे, मानवतेला अनुसरणारी भक्ती हे चारित्र्याचे साधन बनावे यासाठी संतांनी प्रयत्न केले. रूढी, परंपरा, कर्मठ आचार म्हणजे धर्म नाही. सर्व मानसे समाज आहे. उत्तम चारित्र्य, शुद्ध मन आणि माणसांविषयीचे प्रेम या बळावरच माणसाची उन्नती होऊ शकते. त्यासाठी पुरोहितांच्या यज्ञयागाची व पशुहिंसेची गरज नाही असे विचार संतांनी समाजापर्यंत पोहचविले. त्यासाठी त्यांनी अभंग रचना, भारूडे, गौळणी इत्यादी साहित्य प्रकारांचा अवलंब केला. तसेच त्यांनी मौखिक किर्तन, प्रवचनांचाही मार्ग अंगीकारला.

त्यासाठी आपण काही महाराष्ट्रीय संतांची उदाहरणे बघूया. मध्ययुगातील संत नामदेवांनी वारकरी पंथाची सुरूवात करून भागत धर्म स्थापन केला. त्या नामदेवे रचिला पाया ... अशी तुकोबांनी महती गायली आहे.

नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।।

म्हणत संत नामदेवांनी ज्ञानाचे महत्व लोकांना पटवून देण्याचे कार्य केले. प्रस्थापितांच्या विरोधात सर्वात पहिला विद्रोह त्यांनी केला.

त्यानंतर संत ज्ञानेश्वरांनी सुद्धा संस्कृत भाषेतील ज्ञान प्राकृत भाषेत आणून प्रस्थापितांची मुजोरी मोडीत काढत ज्ञानेश्वरी सामान्यांपर्यंत पोहचवली.

येथे कुळ, याती, वर्ण । अवघेची गा अकारण ।। असे वर्णाभिमानी प्रस्थापितांना खडसावले. तर

योग-याग विधी । येणे नव्हे सिद्धी । वायाची उपाधी । दंभधर्म ।।

असे म्हणत योग-याग यामधील दंभ प्रत्यास आणून दिला. नंतर त्यांच्याच समाजाने त्यांच्या नावावर अनेक चमत्कार चिकटवून त्यांना अवतारी पुरूष ठरवण्याचा सातत्याने प्रयत्न केला. त्यानंतर समाजामध्ये धार्मिक ढोंगीपणाला आलेला उत, कर्मकांड व माजलेली बुवाबाजी यावर संत चोखामेळा यांनी

माकडाचे परी, हालविती मान, दावी थोरपण, जगामध्ये ।।
माळा आणि मुद्रा, दाविताती सोंग, डोलविती अंग, रंग नाही ।।
चोखा म्हणे जगा मध्ये भोंदू तया कोण साधू, म्हणे देवा ।।

अशा कडक शब्दात हल्ला चढविला.

सोळाव्या शतकात संत एकनाथांनी सुद्धा अनेक अंध:श्रद्धांवर प्रकार केलेत.

प्रतिमेचा देव केला । काय जाणे ती अबला ।।
नवस करिती देवासी । म्हणती पुत्र देई वो मजशी ।।
न कळेची मूढा वर्म । कैसे जाहलेसे कर्म ।।
प्रतिमा केलीसे आपण । तेथे कैचे देवपण ।।
देव खोटा, नवस खोटा । ऐका जनार्दनी रडती पोटा ।।

अशा पद्धतीने सामान्य लोकांच्या अज्ञानाला बाजूला सारण्याचा प्रयत्न केला.

म्हणती देव मोठे मोठे । पुजीताती दगड गोटे ।।
जीते जीव करूनी वध । दगडा दाविती नैव्यद्य !

इत्यादी रचनांमधून दगडांपुढे जिवंत प्राण्यांना मारू नये असे आवाहन केले. एकनाथांनी भारूडे, गौळणे इत्यादी साहित्य प्रकारांतून सर्व समाजाला जागृत करण्याचे काम केले आहे. आजही खेड्या-पाड्यात बारा अभंगाच्या रूपाने लोकांमध्ये असलेले, तसेच अनेक म्हणी सुभाषिते आणि सुविचारांच्या माध्यमातून लहान-थोर मंडळीना तसेच भल्या भल्या साहित्यिकांना विज्ञाननिष्ट विचारांची प्रेरणा देणारे जगद्गुरू तुकोबाराय हे सर्व संतांमध्ये अग्रस्थानी गणल्या गेलेत. त्यांची बुडती हे जन, न देखवे डोळा, येतो कळवळा, म्हणोनिया ।।

# माझी आई

माझी दयाळु आई, माझी प्रेमाळू आई
तिच्या सारखे या जगात कुणीच नाही ।। धृ ।।

आई बाळाचे पालन पोषन करत जाई
एवढे कठीण काम आईशिवाय कुणाला जमत नाही ।। १ ।।

माणसांची काम ती करत जाई
पण बाईचे काम मानसाला जमत नाही ।। २ ।।

सर्वांचे ताण ती स्वत:वर घेत जाई
आणि सर्वांना ती सुखी ठेवत जाई ।। ३ ।।

हाताला मार लागला तरीही ती भाजी कापत जाई
आणि सर्वांचे पोट ती भरवत जाई ।। ४ ।।

स्वत:चे दु:ख लपवून ती सर्वांसोबत हसत जाई
म्हणून ती सर्वात चांगली आई ।। ५ ।।

कु.मयुरी नारनवरे
बी.ए.भाग - १

ही तळमळ समाजाच्या उद्धारासाठीच होती. तसेच,

सत्य-असत्यासी, मन केले ग्वाही, मानियेले नाही, बहुमता ।।

असे स्पष्ट व परखडपणे बोलणाऱ्या व वागणाऱ्या तुकोबारायांनीच

जे का रंजले-गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।।
तोची साधू ओळखावा । देव तेथेची जाणावा ।।

या ओळींतून देव देवळात नसून रंजल्या-गांजल्यातच असतो आणि त्यांना आपले मानणाऱ्यांमध्येच खरा साधू करत असतो, असे स्पष्टपणे सांगितले आहे.

सांगो जाणती शकुन । भूत-भविष्य, वर्तमान ।।
त्याचा आम्हासी कंटाळा । पहो नावडती डोळा ।।

खऱ्या संताची व्याख्या तुकोबारायानीच करून ठेवली आहे. ते म्हणतात,

तुका म्हणे तोची संत । सोशी जगाचे आघात ।।

तथाकथित भूता-खेतांचे अस्तित्व मानून त्याचे भय बाळगणाऱ्यांची अवस्था तुकोबांनी या पुढील ओळीतून कथन केली आहे.

वाजे पाऊल आपले । म्हणे मागे कोण आले ।।
काही दिसे अकस्मात । तोची वाट आले भूत ।।

तुकोबांनी धर्मातील विविध अंधश्रद्धा कर्मकांड, पुरोहिती, गुरू-शिष्यय परंपरा इत्यादींवर आघात करणारी अभंग रचना करून समाजाचे प्रबोधन केले. परंतु हे मानवीय सत्कार्य धर्म मार्तंडानां रूचले नाही. म्हणून त्यांचे अभंग त्यांनी इंद्रायणीत बुडविले तरी पण ते अभंग त्यांना संपविता आले नाही म्हणून त्यांनी तुकोबारायांना संपविले. तरी ते कधीही न संपणारे संत युगायुगाचे संत होऊन बसलेत.

आधुनिक संतांमध्ये कर्मयोगी गाडगेबाबा हे खरे कृतीवंत, विज्ञानिष्ठ संत होते. त्यांनी दिवसा हाती खराटा घेऊन गांव स्वच्छ केले. तर रात्री किर्तनाच्या माध्यमातून अंधश्रद्धेची घाण साफ केली. समाजातील सर्व अंधश्रद्धांचे कारण अज्ञान आहे. म्हणून त्यांनी शिक्षणाचा आग्रह धरला. ते म्हणत, ज्याले विद्या नसेल त्याले खटाऱ्याचा बैल म्हनलं तरी चालंल. आतातरी सुधरा! आता तरी मुलाले शिक्शन द्या! पैसे न्हाई मनान तर जेवणाचं ताट तोडा, हातावर भाकरी खा, बायकोले लुगडं कमी भावाचं घ्या, इवायाले पावूनचार करू नका, विद्या मोठं धन हाय, मोडक्या घरात राहा, पन मुलाले शाळेत घातल्याबिगर राहू नका ।

गाडगेबाबांनी सत्यनारायणाच्या पोथीवर सडकून टीका केली. त्यांनी समाजाला एवढा मोठा बुद्धिवादी दृष्टीकोन दिला, तो आजही तेवढ्याच प्रखरपणे लागू होणारा आहे.

ग्रामगीता व भजनाच्या माध्यमातून समाजातील दांभिकतेवर आघात करत वैज्ञानिक जाणीवा रूजविणारे संत म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज. राष्ट्रसंतांनी अभंग, ओव्या, श्लोक, गीत इत्यादी साहित्य प्रकारांतून समाजाला जागृत केले. तुकडोजी महाराजांनी पुढील ओळीतून चमत्कार दाखवून संतत्व मिळविणाऱ्यांची पोलखोल केली आहे.

झटका दिया जब हात को पेढा मिठाई ला लिया
खाली उंगली को घिस कर अत्तर सुगंधी पा लिया
ये जादुगार भी कर सके क्या संत कहेना है उसे?

चमत्कार हा फसवा असतो. त्यामुळे जीवन भरकटतं. साधा माणूस त्याला बळी पडतो आणि नको त्या नादी लागतो. म्हणून ते चमत्काराचा भांडाफोड करून त्यापासून दूर जायला सांगतात आणि सज्जनांना आवाहन करतात ...

चमत्काराच्या भरी भरोनी । झाली अनेकांची धूळ-धाणी ।
संत चमत्कार यापुढे कोणी । नका वर्णू सज्जनहो ।।
ही बुवाबाजी भुलवी जन । भ्रष्ट करी ग्रामजीवना ।
फसवोनी भोळ्या-बापड्यांना । भलत्या छंडा लाविती ।।

यशासाठी प्रयत्न महत्वाचे असतात. हा विज्ञानवादी विचार मांडतांना महाराज म्हणतात ...

उगीच भरले चमत्कार । पुजापातीचा डोंगर ।

जीवनाचे काहीच सार । नसेल त काय कानी? ।।
प्रसादासाठी पोथी लाविली । चमत्कार ऐकता वेळ गेली ।
आपली बुद्धी गहाण पडली । ऐसे न व्हावे यापुढे ।।

अशाप्रकारे समाजाच्या निकोपतेसाठी, ग्राम–आरोग्यासाठी तुकडोजी महाराजांनी समाजाचे प्रबोधन केले आहे.

अशाप्रकारे प्राचीन कालखंडातील विवेकवादाचे पुरस्कर्ते, ऋषींनी व मध्ययुगीन काळातील तुकडोजी महाराजापर्यंतच्या संतांनी समाज निकोप, सुदृढ व वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणारा बनून सगळीकडे समता प्रस्थापित व्हावी या हेतूने साहित्य निर्मिले. त्याचा प्रसार केला. वर्तमान काळातील स्वयंघोषित साधू–संतांची कामगिरी व त्यांचे चारित्र्य पाहिल्यावर खरे संत कोणाला म्हणावे? व कोणाचे मार्गदर्शन आचरणात आणावे? हे सुद्धा वाचकांनीच ठरविलेले बरे ।

# कहानी ३ मित्रांची की,

ज्ञान, धन और विश्वास
तीन बहुत अच्छे दोस्त थे
तीनो में बहुत प्यार भी बहुत था
इक वक्त आया जब तीनों को जुदा होना पडा
तीनों ने इक दुसरे से सवाल किया
की हम कहाँ मिलेंगे
ज्ञान : मै मंदिर, मस्जिद, विद्यालय में मिलूँगा ।
धन : मै अमीरों के पास मिलूँगा ।
विश्वास चूप था, दोनो दोस्तो ने चुप होने की वजन पूँछी तो विश्वास ने रोते हुए कहा : मै इक बार चला गया तो
फिर
कभीनही मिलूँगा ...

अनिकेत रमेश ढोरे
बी.एस्सी.भाग - २

# असं कां?

कां? ते पागल होते?
ते लढले आपल्या साठी!
केला सहन भार
होती इंग्रजांची लाठी
बघितले स्वप्न
केला स्वतंत्र भारत
पुढील पिढी करील उन्नती
होते त्यांचे मत
पण ... , बघा,
निघाले सर्व स्वार्थी
कां? त्यांनी केला गुन्हा?
गेले कार्य वाया अर्थी
करीत नाही कोणी
त्यांना स्मरण स्मृती
ठेवा ध्येय, गाठेल उच्चांक भारत
करा तशी कृती,
कोणाला नाही वाटत
आपण जगतो कशे?
विचार करावे,
कार्य दिसे उमटूनी
या जगात ठसे,
प्रत्येकाने मनात धरावे
मला करायचं आहे काही
जेणे करून नाव घेईल जनता
तृप्त होतील दिशा दाही

स्विटी व. येवले
बी.कॉम.भाग - २

# आठवणीतील एनएसएस कॅम्प २०१७-१८

दिनांक २७ डिसेंबर २०१७ ते २ जानेवारी २०१८

कृणाल ए. भांगे
बी.कॉम.भाग - ३

काटोल तालुक्यातील लहानसे गाव ते म्हणजे पारडसिंगा या ठिकाणी माझ्या कॉलेजचा एनएसएस कॅम्प गेला होता. दिनांक २७ डिसेंबर ला ज्या क्षणी मी त्या गावात पाय ठेवला त्या क्षणी त्या गावातील नागरिक व त्यांची सहिष्णुतेची वागणूक श्रमभावना जिव्हाळा हे सगळं त्या गावापासून मिळालेला एक सुखाचा क्षण आहे.

मला एनएसएस कॅम्पच्या माध्यमातून त्या गावाचा सात दिवसाचा सहवास आला. त्या सात दिवसात आम्हाला मदत करणारे तेथील सरपंच यांनी आम्हाला वेळोवेळी सहकार्य केले. त्यांची प्रेमाची भावना एक वेगळाच जिव्हाळा त्यांनी आमच्यावर लावला होता व त्यातील ग्रामपंचायत सदस्य आणि गावातील नागरीक यांचे आम्हाला वेळोवेळी सहकार्य लाभले त्यांचे आम्ही सर्वऋणी आहोत.

एनएसएस कॅम्पमधील ते सात दिवस माझ्या जिवनातील एक असे अविस्मरणीय क्षण आहे की मी ते माझ्या जीवनात कधीच विसरू शकत नाही. त्या एनएसएस कॅम्पमध्ये सात दिवसात खुप काही शिकावयास मिळाले. कारण आमचा एनएसएस कॅम्पचे अधिकारी प्रा.राजेंद्र घोरपडे यांनी आम्हा सर्वांना नवनवीन गोष्टी शिकायला मिळाल्यात आणि इतर क्षेत्रांची माहिती व्हावी म्हणून दररोज सकाळी व सायंकाळी नवीन नवीन विषयावरील वक्ते बोलावून त्यांचे व्याख्यान आयोजित केले. ते वक्ते आम्हाला जीवन जगण्याबददलचे मार्गदर्शन करायचे व आम्ही सर्व स्वयंसेवक त्या वक्त्यांचे कार्यक्रम मात्र मोठ्या उत्साहाने व आनंदाने ऐकायचे पण दुपारच्या सत्रात मात्र आमच्या सर्व स्वयंसेवकांची मोठी फजिती होत असे कारण आमचे दुपारचे सत्र सुरू व्हायच्या अगोदर जेवनाचा कार्यक्रम व्हायचा व नंतर दुपारच्या सत्राला प्रारंभ व्हायचा. जेवन झाल्यावर दुपारी तो कार्यक्रम ऐकण्यासाठी तीन तास आम्हाला सतत बसावे लागत असे आणि त्या दुपारच्या सत्रात जेवन झाल्यावर बसणे म्हणजे मोठे आवाहनच राहत असे. तरीपण आम्ही सर्वजन दुपारच्या सत्राचा आस्वाद घेत असायचो. आमच्या कॅम्पच्या तीसऱ्या दिवशी संध्याकाळच्या सत्रात प्राचार्य विजय धोटे सर, त्याचबरोबर पवार सर, ठाकरे सर व प्रा.जिचकार मॅडम, डंभाळे मॅडम या सर्वांनी एक असा वक्ता बोलाविला कि त्या वक्त्याने आम्हाला कार्यक्रमातून गाडगेबाबाचा स्वच्छतेचा संदेश दिला व गाडगेबाबा गावोगावी जावून स्वच्छता करायचे हे त्या वक्त्याने आम्हा सर्वांना त्यांच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून सांगितले.

कारण तसं पाहिले तर स्वच्छता हे एनएसएस शी जोडलेलं एक नावचं आहे. स्वच्छता व एनएसएस या एका नाण्याचा दोन बाजूच आहेत.

आम्हा सर्वांचे सात दिवस म्हणजे गावातील जी घाण आहे ती स्वच्छ करणे व गावातील नागरिकांना स्वच्छतेचा संदेश देणे हे आमचे स्वयंसेवकांचे काम. एक वेगळाच जोश व आनंद या गावात स्वच्छता करण्यास असे व आम्हाला गाव स्वच्छ करण्यात एक वेगळाच अभिमान वाटत असे. आम्ही त्या पारडसिंगा, कोळंबी, वडविहीरा

या गावातील गल्लीगल्ली साफ करू लागलो व पाहता पाहता आमचे ते सात दिवस त्या तीन गावात कसे निघून गेले ते आम्हाला काही कळलेच नाही.

ते सात दिवस आम्ही मित्र, मैत्रिण एकत्र सहवासात खूप आनंदाने राहिलो. कधी आम्ही मजा तर कधी मनोरंजन तर कधी हास्यविनोद तर कधी नाटक करत. आम्ही मोठ्या आनंदाने ते सात दिवस घालविले. दुसरा दिवस उजाडला तो म्हणजे आमच्या कॅम्पचा शेवटचा दिवस होता.

शेवटचा दिवस असल्याकारणाने सर्वांच्या चेहऱ्यावरचे हास्य जसे कोणी हिरावुन नेले तसे झाले होते. कॅम्पमधला प्रत्येक स्वयंसेवक त्या दिवशी दु:खाच्या सागरातुन वाहत होता व प्रत्येकाच्या चेहऱ्यावर एक नैराश्य पसरले होते. कारण कॅम्पमध्ये सहा दिवस मोठ्या आनंदाने घालविले होते. आम्ही नवीन वर्षाची सुरूवात त्या कॅम्पमध्ये केली होती. कधी मौजमजा तर कधी हास्यविनोद तर कधी रस्ता सुरक्षा नाटक हे सर्व करत आम्ही सर्व स्वयंसेवक कुटूंबाप्रमाणे राहत होतो. पण आज ते सहा दिवस संपले होते. त्यामुळे कोणाचेही पाय मात्र घरी जायच्या दिशेने वळत नव्हते.

त्या कॅम्पमध्ये फक्त आणि फक्त सात दिवसच राहावे लागत होते. मग आम्ही सर्व स्वयंसेवकांनी आपापल्या बॅग पॅकिंग केल्या. मग शेवटचा दिवस म्हटल्यावर प्रत्येकजन आठवणीचे क्षण म्हणून मित्र-मैत्रिणीसोबत फोटो काढण्यात मग्न झाले. प्रत्येक जण ग्रृप करून फोटो काढू लागले. कोणी सरांसोबत तर कोणी स्वयंपाक करणाऱ्या बाईसोबत सगळे जन कॅमेऱ्याच्या माध्यमातून ते क्षण कैद करू लागले. तसेच त्या गावातील लहान लहान चिमुकले मुले व गावकरी सुद्धा नाराज झाले होते. मग तो फोटो काढण्याचा कार्यक्रम संपला. त्यानंतर

# प्रेम कुणावर करावे

प्रेम कुणावर करावे?
जो आपल्याला आवडते त्याच्यावर
की ज्याला आपण आवडतो त्याच्यावर?
प्रेम कुणावर करावे?
मन वेधुन घेणाऱ्या गुलाबावर
की त्याला जपणाऱ्या काट्यावर?
प्रेम कुणावर करावे?
जन्म घेतलेल्या मायभुमीवर
की तिच्यासाठी प्राण अर्पण करणाऱ्या जवानांवर?
प्रेम कुणावर करावे?
सुंदर नाजुक वेलीवर
की तिला आधार देणाऱ्या वृक्षांवर?
प्रेम कुणावर करावे?
रंग-बिरंगी दिसणाऱ्या फुलपाखरांवर
की तिला बागडण्याची चेतना देणाऱ्या वाऱ्यावर?
तुम्हीच सांगा ...
प्रेम कुणावर करावे?
परवा भेटलेल्या मुलीवर
की आयुष्यभर आपल्यावरून जीव ओवाळून
टाकणाऱ्या
आई-वडीलांवर?

कु.कांचन धानोरकर
बी.कॉम.भाग - ३

प्रत्येकाच्या भेटी घेत प्राध्यापक तसेच गावातील नागरीक व सरपंच यांच्या सोबत हस्तांदोलन करत आम्ही सर्वजन कॅम्पमधून रवाना झालो.

पण आजही ते कॅम्पमधील दिवस आठवणीत आले व त्या दिवसातील आठवण होताच माझे मन गहिवरत आहे.

# शिक्षक हा शिल्पकार

प्रत्येक व्यक्ती शिक्षणाने घडतो
घडविणाऱ्याला आपण शिक्षक म्हणतो
शिक्षक फक्त शिक्षकच नसतो तर तर जीवंत मुर्ती घडविणारा
एक उत्कृष्ठ शिल्पकार असतो
ज्ञानाच्या अवजाराने असंख्य वार तो नकळत करतो
म्हणूनच विद्यार्थ्यांच्या हृदयात तो आयुष्यभर उरतो
विद्यार्थी जीवनात शिक्षक समई सारखा असतो
शिक्षक नसला तर भविष्यात काळोखच काळोख दिसतो
शिक्षणाशिवाय व्यक्ती भिकारी असतो
ही अमोल संपत्ती मिळवून देणारा एक गुरूवर्य उपकारी असतो
विद्यार्थ्यांच्या यशात सर्वात मोठा वाटा शिक्षकांचा असतो
पण तरीही त्यांच्या प्रगती शिखरावर शिक्षक कुठे दिसतो
शिक्षकांचे अविस्मरणीय व्यक्तीमत्व
विद्यार्थ्यांच्या मनात बसते हेच त्यांची खरी ध्येय प्राप्ती असते

कोमल वि. पांडे
बी.कॉम.भाग - १

# आयुष्य

आयुष्यभर सोबत असुन
जवळ कधी बसत नाही
एकाच घरात राहुल आम्ही
एकमेकांस दिसत नाही
हरवला तो आपसांतला
जिव्हाळयाचा संवाद
एकमेकांस दोष देवून
नित्य चाले वादविवाद
धाव धाव धावतो आहे,
दिशा मात्र कळत नाही,
ह्रदयाचे पाऊल कधी,
ह्रदयाकडे वळत नाही
इतकं जगुन झालं पण
जगायलाच वेळ नाही
जगतो आहोत कशासाठी
काहीच कसला वेळ नाही
क्षण एक येईल असा,
घेऊन जाईल हा श्वास
अर्ध्यावरच थांबलेला,
असेल जीवन प्रवास,
अजूनही वेळ आहे,
थोडं तरी जगून घ्या,
सुंदर अशा जगण्याला,
डोळे भरून बघून घ्या.

कु.मयुरी नारनवरे
बी.ए.भाग - १

# सॉरी

कु.पुनम आर. भंडारी
बी.ए.भाग - ३

सॉरी म्हणून सरळं संपतं का रे पोरा?
अरे आम्ही जीव टाकला होता तुझ्यावरून ओवाळून
तू मात्र सॉरी म्हणून बसलास मोलाचा जीव गमावून
संपतील का रे सारे प्रश्न फक्त सॉरी म्हणून ?

मोठी माणसं नेहमीच बोलतात –
आजचे तरूण सगळंच कसं सहजपणे घेतात
कितीही मोठ्या चुकांसाठी फक्त सॉरी म्हणतात
पण – आत्यहत्येसारखं पाप करतानाही फक्त सॉरीच म्हणता का रे?
अन् आत्महत्येनं सगळेच प्रश्न सुटतात तरी का रे?

सांग ना रे राजा, सॉरी म्हणशील तरी कशाकशाला?
आईनं तुला पाजलेल्या अमृतासमान दुधाला?
की बाबांनी तुझ्या आजारपणात जागून काढलेल्या रात्रीला?
ताईनं तुझ्या मणगटावर प्रेमानं बांधलेल्या राखीला?
की दादानं पाठीवर हळूच दिलेल्या शाबासकीला?

कसा विसरलास राजा –
आईनेच तुझ्या दु:खात दिला असता रे हात
बाबांनीच तुला शेवटपर्यंत दिली असती रे साथ
ताई – दादांच्या हळुवार शब्दांनी केली असती तुझ्या संकटांवर मात
आता मात्र तू साऱ्यांचाच कसा केलास रे घात?

तुला कल्पना तरी आहे का राजा –
आईचं मन आता कण कण जळतंय्
बाबांचं हृदय आता तीळ तीळ तुटतंय्
ताईचे डोळे येताहेत पुन्हा भरून भरून
अन् दादाचं डोकं सुन्न होतंय विचार करून करून

एकदाच कुढत बसलास, आम्हाला
सांगितलं का नाही रे?
मरण पत्करून कुणी मोकळं होतं का रे?
वाटून घ्यायचे होते आम्हाला, दुःख आभाळाएवढे तुझे!
मात्र ठेवून गेलास फक्त संकटं अन् दुःखाचे ओझे!

सगळं सगळं तुला माहित होतं ना रे बाळा
मग का केलास असा मरणाशी चाळा?
एवढा एकाकी नव्हतास रे तू!
एवढा दुःखीही नव्हतास रे तू!

जगणं म्हणजे राजा असतं तरी काय?
अरे जगण्याचा असतो नेहमीच
दुःखाशी टाय
समोरे जाऊनच करावा लागतो
दुःखाला बाय
कसं कळलं नाही राजा, जीवन
म्हणजे असतं तरी काय?

अरे ऐकून घ्यावं लागतं राजा, जीवनाचं म्हणणं
गावं लागतं राजा, भर दुःखातही गाणं
गलितगात्र झालो तरी, चुकवावं लागतं देणं
यालाच म्हणतात राजा, खऱ्या पुरूषार्थाचं जगणं!
यालाच म्हणतात राजा, खऱ्या हिमतीनं लढणं!

# मला जगायचंय

कु.प्रिती एन. सातपुते
बी.ए.भाग - ३

नका मारू मला गर्भातच
मला हे जग पहायचंय
अहो! सांगा ना माझ्या बाबाला
मला जगायचंय!

जन्माला येऊन मला दादाबरोबर
खूप खूप खेळायचंय
अहो! सांगा ना माझ्या आईला
मला जगायचंय!

रोज शाळेला जाऊन मला
इतर मुलांप्रमाणे ही शिकायचंय,
अहो! सांगा ना माझ्या बाबाला
मला जगायचंय!

स्त्री – शिक्षणाची मशाल हाती घेऊन
देशाच्या प्रगतीला हातभार लावायचाय,
अहो! सांगा ना माझ्या आईला
मला जगायचंय!

नारी शक्ती संघटित करूनी
सावित्रीबाई, बहिणाबाई अन जिजाऊ व्हायचंय
अहो! सांगा ना माझ्या बाबाला
मला जगायचंय!

माझा जीव घेऊ नका करू तुम्ही पाप
मला जन्म घेऊन पुण्य करायचंय
अहो! सांगा ना माझ्या आईला
मला जगायचंय!

अहो! सांगा ना माझ्या बाबाला
मला जगायचंय! मला जगायचंय!
मला जगायचंय!

# एक होऊ चला!

जपण्याशी सदा अस्मितेला, एक होऊ चला आज सारे
शोषकांची गुलामी झुगारा, कोठडीची तोडा बंद दारे ।

नम्रता ही मनी, देही ताठा, ठेवूनिया जगी वावरावे
दुष्ट अन्याय हा संपवाया, सत्य न्यायाशी हृदयी धरावे
ध्येय गाठावया अंगिकारू, धैर्य, विश्वास सातत्य सारे ।

दोष देणे फुका हा कुणाशी, नसे नीती खऱ्या मानवाची
स्नेह राखू जरी अंतरात, परि करू खांडोळी नीचतेची
नांदू या बांधवांप्रमाणे, हे सामर्थ्य मनी बाणवा रे ।

धर्म, रूढी, प्रथा गैर ज्या ज्या, दुर सारा मना बोचणाऱ्या
उन्नतीला नेई सुजनांना, कवटाळू या अशा वंद्य साऱ्या
काळजाशी अशी काळीजे ही, जोडण्याशी सदा धडपडू रे ।

जागविण्या समाजास येथे, झिजणे होते महामानवांचे
बलिदानामुळे या वीरांच्या, हे अस्तित्व रे बहुजनांचे
ऋण मानावया तयांचे, विचारांनाच त्या आचरा रे ।

संकेत जाचक
बी.एस्सी.भाग - ३

# म्हणून नाही विचारलं मी तिला!!!

ती आवडली, पण मी नाही विचारलं तिला ...
डिलीट करेल फ्रेंड लिस्ट मधून ती मला
म्हणून नाही विचारलं मी तिला ...
बोलणार नाही माझ्याशी, म्हणून नाही विचारलं मी तिला ...
एक गैरसमज करून घेईल मी माझ्या बद्दलचा
म्हणून नाही विचारलं मी तिला ...
सामोरा कसा जाणार तिच्या
म्हणून नाही विचारलं मी तिला ...
भेटून सुद्धा नाही भेटणार,
म्हणून नाही विचारलं मी तिला ...
कोणाला सांगूही शकणार नव्हतो,
की किती आवडते ती मला,
कसा सांगणार मी तिला, कि
खूप आवडते ती मला?
भिती वाटते त्या एका नाही ची
म्हणून नाही विचारलं मी तिला ...
अजून किती व्हॅलेंटाईन डे निघून जातील
पण नाही विचारणार मी तिला ...
राहू दे मला या गोड अशा गैरसमजूतीत
कि, आवडतो मी तिला ...
आवडते ती मला ...

**कु.गुंजन चौधरी**
बी.एस्सी.भाग - २

# तुम्ही आणि तू

मैत्रीच्या नात्यातील फारकत व्यक्त करतो शब्द तुम्ही तर त्या नात्यील जवळिक, जिव्हाळा व्यक्त करतो शब्द तू.

जसे तरूवरील पाखरांचा कलर तुम्ही
तर मंदीरातील नीरव मांगल्य तू

पावसाच्या धारेतील पाण्याचे थेंब तुम्ही
तर पापण्यांवर ओथंबलेले अश्रुंचे थेंब तू

विविध फुलांतील मधुरस तुम्ही
तर पोळ्यातील मधाचा गोडवा तू

श्वासोच्छवासातील उच्छ्वास तुम्ही
तर श्वासातील प्राणवायू तू

मैत्रीमध्ये, तुम्ही या शब्दाने दुरावा नका वाढवू
तू हा शब्द म्हणून ऋणानुबंध जपवू

**रवि आर. फंदी**
बी.ए.भाग - १

# जगा पण माणसांप्रमाणे

माणूस म्हणून जन्मलो, माणूस म्हणून जगायचे आहे
माणसांच्या भल्यासाठी काही क्षण त्यागायचे आहे
मी ज्ञानवंत जरी नसलो, प्रतिभेचा धनी आहे
झोपडीत वंचितांच्या मज दीप उजळायचा आहे
प्रेम, दया, कारूण्य मज जोजवायचे आहे
ह्या माणसांतले बुद्ध, कबीर, जागवायचे आहे
भिमराव, शिवराय, फुले, उरी कोरावयाचे आहेत
मी केवळ निमित्तमात्र, त्यांचे विचार पेरायचे आहेत
अज्ञान, अंधश्रद्धेचे काळीज सोलायचे आहे
जिवघेण्या कुप्रथेवर घाव घालायचे आहेत
गात, गात रडगाणे मज रडत बसायचे नाही
लबाड सोंगीढोंग्यांचे मज गीत गायचे नाही
नव युगावे, नवक्रांतीचे मज गीत गायचे आहे
तरूणांचे मज सळसळते रक्त व्हायचे आहे
भ्रमांच्या मलमलीं, ना मज त्यांना आहे
समाजाच्या ऋणामधून मज मुक्त व्हायचे आहे.

**चेतन रेवतकर**
बी.एस्सी.भाग - ३

# किती क्षणाचं हे आयुष्य असतं

किती क्षणाचं हे आयुष्य असतं
आज असतं तर उदया नसतं
म्हणून ते हसत हसत जगायचं असतं
कारण येथे कुणीच कुणाचं नसतं
जाणारे दिवस जात असतात
येणारे दिवस येत असतात
जाणाऱ्यांना जपायचं असतं
येणाऱ्यांना घडवायचं असतं
आणि जीवनाचं गणित सोडवायचं असतं
म्हणूनच कधी कुणासाठीतरी जगायचं असतं
कुणासाठीतरी जगायचं असतं ...

# तुझे काय?

जन्म : दुसऱ्याने दिला
नाव : दुसऱ्याने ठेवलं
शिक्षण : दुसऱ्याने दिले
रोजगार : दुसऱ्याने दिला
इज्जत : दुसऱ्यानं दिली
पहिली आणि शेवटी आंघोळ सुद्धा : दुसरेच घालणार
मरणानंतर संपत्ती : दुसरेच वाटून घेणार
आणि स्मशान भुमीत : दुसरेच घेवून जाणार

तरी देखील संपूर्ण आयुष्यभर मानसाला कोणत्या गोष्टीचा गर्व असतो हे सांगणे मात्र कठीणच!! दुख इतकं नशिबवानं आहे की ज्याला प्राप्त करून लोक आपल्या मानसाला आठवतात. धन इतकं दुर्दैवी आहे की, ज्याला मिळवून लोकं नेहमी आपल्या मानसांना विसरतात. किती अजब आहे ना!!? माणसाच्या शरीरात ७०% पाणी आहे. पण जखम झाली की रक्त येतं आणि माणसाचे हृदय रक्ताचे बनलेले असून हृदय दुखावलं की डोळ्यातून पाणी येतं.

**कु.अश्विनी भस्मे,** बी.एस्सी.भाग - ३

# हिंदी विभाग

प्रभारी प्राध्यापिका

**प्रा.भाविक मनियार**

# राष्ट्रीय एकता ; राष्ट्र की संपत्ती

शुभम एस. वानखेडे
बी.ए.भाग - २

यह स्वयं सिद्ध है कि विश्व के किसी भी आन्दोलन या परिवर्तन के मूल में मुख्यत: शिक्षकों और छात्रों की ही अहम् भूमिका रही है । शिक्षक बौद्धिकता और प्रेरक शक्ति के रूप में अपना योगदान देते है जबकि युवक उर्जा शक्ति के भंडार होने के कारण पुरे क्रिया कलाप का संचालन करते है । शिक्षक देश की एकता और अखण्डता, सम्प्रभुता और क्षेत्रीय अखण्डता के प्रति कृतसंकल्प होते है और विद्यार्थी वर्ग तो सदा की भाँति राष्ट्रीय ध्वज की लहराते हुए क्रांति की लौ को प्रज्वलित रखने में आगे रहा है । वास्तविकता यह है कि नवयुवको में जो त्याग, तपस्या और बलिदान की भावना स्वाभाविक रूप से कूट कूट कर भरी रहती है वह वयस्क लोगों में क्षुद्र स्वार्थो में रहने के कारण नही पायी जाती है । युवक ही देश के भविष्य है और उनके निर्माता है शिक्षक गण । कहा गया है स्वतंत्रता के प्रश्न का सिंचन अमर सेनानियों और अत्याचारियों के रक्त से होता है ।

स्वतंत्रता प्राप्ति के पूर्व युवकों और विद्यार्थियों में अदम्य उत्साह, साहस, आत्मनिर्भरता, संकल्प शक्ति, उद्देश्य मूलक जीवन शैली, सरल एवं आदर्शो के प्रति प्रतिबद्धता स्वाभाविक गुणों के प्रचुर मात्रा में पाया जाना सामान्य बात थी । उस समय हर क्षेत्र के लोगो ने पूरी निष्ठा, लगन और संलग्नता के बलबूते पर बडी बडी ऊँचाइयाँ छुई थी । देश को हीन भावना से भी ऊपर उठना था । जिसके फलस्वरूप आश्चर्यजनक उपलब्धियाँ प्राप्त की गई । लोगों ने देखा कि चाहे वह १८५७ का गदर हो या १९४२ का भारत छोडो आन्दोलन या १९४७ में जयप्रकाश नारायण द्वारा संचलित प्रजातंत्र प्राप्ति का जनान्दोलन, १९६२ का चीनी आक्रमण या पाकिस्तानी आक्रमण या कारगील हो, सबमे राष्ट्रीय एकता नए सिरे से स्थापित हुई और इन सब में जातीवाद या सम्प्रदायवाद की दुर्गन्ध नही थी । इससे यह भी सिद्ध होता है की कभी भी राष्ट्रीय एकता जाति एवं सम्प्रदायवाद पर आधारित नही हो सकती । बांगला देश की स्थापना और पाकिस्तान की टूटन भी यह सिद्ध करती है कि सम्प्रदाय से बढकर संस्कृती है । सम्प्रदाय हर हालत में सबकी एकसूत्र में नहीं बांध सकता है, किन्तु संस्कृति बाँध सकती है ।

भारत संस्कृति प्रधान देश है । संस्कृति इसकी आत्मा है । यह धर्मान्धता से नही जकडा है । यहाँ किसी प्रकार भी आतंकवाद, घृणा, द्वेष, स्पर्धा का लेश मात्र स्थान नहीं है । यह शाश्वत मानवीय गुणों पर आधारित वह परम्परागत शैली है । जो ५००० वर्षो से अधिक समय से एक सूत्र में पिरोये हुए है । यह हमारी अखण्ड निधि है जिस पर हम गर्व कर सकते है ।

आज की दुष्प्रवृत्तियाॅ अतिवादी है उनके सहनशीलता के तत्व नही है, संकीर्णता और उपभोक्तावाद के दुर्गुणों की भरमार है । भारत पश्चिमी देशो को अन्धानुकरण करके सुख सुविधाओं को गुलाम नहीं बना सकता । इसे आत्मनिष्ठ एवं आत्मनिर्भर बने रहने के लिए त्याग, तपस्या और बलिदान के आदर्शो को कभी छोडना नही होगा । भारत जैसे देश में उन्माद और कट्टरवाद नही फैल सकता । यहाँ की जीवन शैली संश्लिष्ट है । यही इसका राष्ट्रीय एकता का रहस्य है । इसी के बलबूते पर राष्ट्रीय एकता की सिद्धि संभव है ।

# सच्चाई की राह

आकाश डी. लक्षणे
बी.ए.भाग - ३

एक घर मे रहने का मतलब परिवार नही होता, और ना ही एक परिवार में रहने का मतलब घर होता है। जब ये दोनों दिल से साथ हों तब ही घर परिवार और परिवार घर कहलाता है। मगर आज के जमाने में यह दोनो हीं कही खो गए हैं। पर इन सब के लिए हम किसी एक को दोष नही दे सकते। वो कहते है ना, ताली एक हाथ से नही बजती है, ठीक उसी तरह इन सब में किसी एक की गलती नहीं है, बल्कि दोनो का मेरा मतलब बडों और बच्चो की बराबर गलती होती है। इसी तरह असल जिंदगी में भी बहुत से ऐसे पल आते है जहाँ बच्चो और माँ-बाप दोनो की ही गलती होती है, मगर बच्चो को छोटा समझ कर चुप करा दिया जाता है। आज के समय में सबसे ज्यादा जरूरत यह है कि माँ-बाप अपनी सोच को समय के साथ बदलें और अपने बच्चों के साथ दोस्त की तरह व्यवहार करे न कि उन्हे डरा कर रखें। डरा कर रखने से बच्चे सिर्फ गलत राह पर ही जाएँगे और वही अगर बच्चो को प्यार से दोस्त की तरह रखा जाए तो वे हमेशा सही राह पर जाएँगे। साथ ही बच्चो का भी यह फर्ज बनता है कि, अपने माता-पिता के बारे में उतना ही सोचे, उनकी बातो को समझे, उनके साथ वक्त बिताएँ। माता-पिता को भी अपने बच्चो की बाते सुननी और समझनी चाहिए न कि यह सोचे की लोग क्या कहेंगे। उन्हे सिर्फ अपने बच्चो पर भरोसा होना चाहिए। लोग तो हमेशा कुछ न कुछ कहते ही है। अगर माता-पिता और बच्चे एक दुसरे को समझने लगे, साथही वे अपनी सोच बदले और लोगो की परवाह करना छोड दें तो बच्चे भी अपने माता-पिता की बातो को समझेंगे और हमेशा सही और सच्ची राह पर चलेंगे। और तब वह घर एक परिवार और परिवार एक घर बन जाएगा।

# भारत की स्वतंत्रता

अपना हिमालय अपनी गंगा,
गणतंत्र पर फहरा तिरंगा,
देशयुक्त अपने हित नियम
एकजुट हो उठे सब कदम

बापू, नेहरू, सुभाष के अपने
है अधूरे रंग भरने,
धर्म-जाति न क्षेत्र बीच में,
नहीं तवज्जो ऊँच-नीच में,

हमरा एक वतन है भारत,
लिखनी है अब नई इबादत,
नही रहे अभाव-गरीब,
परिश्रम से बदले सबका नसीब,

है हमारा भारत प्यारा,
आसमान मे चमके जैसे ध्रुव तारा,
कृषि-व्यापार और विज्ञान सतत्
प्रगति करे हिन्दुस्तान।

कु.सिमा बेहनिया
बी.ए.भाग - १

# इंग्रजी विभाग

प्रभारी प्राध्यापक

**प्रा.दादाराव उपासे**

# A POSITIVE ROLE

Ku.Shreya Kalbande
B.Sc.-III

Many people are ignorant about goals, some intentionally do not keep any goals and others keep goals and reach there. The vital ingredient in a goal is that the author knows exactly what he wants but may not know how to reach it. Goals are objectives, aims and intentions. They are not a mere wish, dream or an idea. A life without goal is playing a game like football scoring no goals.

Some keeps goals and abandon them thinking that they can't reach them. We find in cinema, some of the actors start as extras, supporting actors hoping that ultimately they would become the hero or villain. But neither happens and the actor fades out and is foregotten. Normally, people formulate goals to impress others, some want to overtake others, the remaining want to become genuine honest victors without hurting anyone.

We can't entertain vague notions like : "I want to be a success" or "I want to become famous" which means apparently nothing. But if we think in specific terms. : "I want to be a Teacher" and work hard towards achieving it we will certainly become a teacher. There are many we see around who qualify as an Engineer or a Doctor and ultimately become a bureaucrat or a businessman. This happens because of the craving for money.

Desire is the starting point of all achivements. When we get ignited with desire, we proceed ahead and reach a place where we are happier than before. Some of us suffer from the expediency factor. For egs we do 'footpath shoping' and later discover that what we purchased is fragile and not durable. Some go to the shop and purchase reputed brands which last longer.

Experts say that there are three things that are difficult to do. One is to climb a fence that is leaning towards us. Second, is to catch something which is running faster than us. Third, is to try to help someone who does not want to be helped. We have to understand that no one will come to help us to start something. If we want to start a business. we have to find the money and invest it in a small way, earn profit and expand it to a level where we can control it. Many

enterprises collapse because it expands beyond control and somewhere someone mismanages things.

Many times, people attempt to set up things which is beyong their capacity and management and regret for starting them. There is a popular saying : "When you give a man a doll, you deny him his dignity you rob him of his destiny". That is why beggars will remain as beggars and cheats will remain as cheats only. When we reform people, they became better and as asset to society.

We run educational institutions like school, colleges and universities. When we give too many holidays, their standards to down. when you overwork then also standards don't go up. There ia an optimum level where people can climb and become better. That level has to be discovered and a leader identifies that level and to raise it to that extent at the opportune time.

An employed person is likely to get a better job than an unemployed one. We get on top of a profession once we start an enterprise but when we wait indefinitely for an opportunity, it does not appear and our plans go haywire. When we continue our journey to the top, we must know that each rung of the ladder was placed or fixed there for the purpose of holding the foot long enough to take the next higher step. When things are tough, we have to fight one more round to win.

We remain at the same level in life when we become nagative thinkers. When we become positive, we move forward or upward and become a person with a diffrence. We have to keep on trying, till we find our awareness and from there onwards fight every round to become the winner or champion. Oliver Wendell Holmes said "People stop talking about you when you stop growing". When we travel on the roads we find many status of great men who have done immense things to help the community. Remember that these are the people who were critised while doing the things. We don't find the status of anyone who is a consistent critic.

The secret of life is balance and the absence of balance is life's destruction. My friend used to say "When the wheel of life is out of round, the ride gets tough. When we use balance to reach where we are going, we certainly reach there. Nothing is impossible when we follow our inner guidance. When the inner voice is stifled, decline starts and we perish.

# CONNECTION WITH A GREAT MASTER

Hardik S. Deshmukh
B.Sc.-II

The guru is an embodiment of wisdom and love. In sanskrit, the word for gravity is gurutvakarshan. The earth holds on to us with the force of gravity. Without this attraction or love, we would not have a base. Similarly, gurutva is the basis of our life. The guru is the guiding light who removes the darkness of ignorance and shows the path to wonderment.

One day, while Lord Shiva was performing a puja, his consort Parvati sees him bowing his head in reverence. Seeing this, she asks "You are the supreme consciousness, the sub-stratum of entire creation. Who is it that you bow down to?"

Shiva replied "Dear Parvati, for the benefit of all humanity, I will answer your question. It is to the all pervading gurutatva that I bow down to". In the many beautiful verses that followed in the Guru Gita, Shiva explains the guru principle and says how fortunate one is to have a living master in his life.

The guru in the physical form is called pratyaksh. In the presence of the master, our enthusiasm and spirit are in an elevated state. Our sorrows diminish, joy wells up, there is contentment, knowledge is nourished and protected and talent blossoms.

When a drop feels connected to the ocean, it feels the strength of the ocean. When we are connected to this tradition, we feel the strength and protection of all the masters. All these masters are an expression of the same Infinite, Undivided Supreme and Pure consciousness.

The guru is a tatva - omnipresent, omniscient, omnipotent principle. Establishing connection with this tatva is a source of great strength. We know we have forefathers, great-grandparents and so on. Yet we feel most attached and connected to our parents or grandparents because they are with us. Similarly, we have many gurus in our tradition, but when we come in the presence of a living master, the connection is established immediately. The entire knowledge from time immemorial is made available to us. Guru Purnima is a time to feel grateful. The more grateful we are, the more grace flows into our lives. On Guru Purnima, we remember all the masters who were, who are and who will be in the future. We feel gratitude towards the master who moves us from a limited understanding and pride of "I know everything" to "I am everything".

A disciple seeks knowledge. A devotee seeks nothing. A devotee is soaked in love and devotion. Guru Purnima is a special day of the devotee as well. When a river meets the ocean,

the river no longer remains a river. It becomes the ocean. It is the same when the devotee meets the Divine. Only divinity remains. The individual "I" dissolves in the one divinity.

When we look at the world through the eyes of the master, the world will look so much more beautiful - a place filled with love, joy, compassion and virtues. The masters presence is one that is unlimited, vast, infinite and all inclusive. The presence of the master is one's life brings fulfullment in all other relationships.

To that one, eternal, pure, unbounded embodiment of knowledge and absolute bliss, to the lotus feet of my master, I bow down with respect and gratitude.

# FRIENDS WHO ARE AN INSPIRATION

People come into our life disguised as angels, and sometimes angels come into our life disguised people. It is possible to see God anywhere. All it takes are open eyes and ears and the willingness to see miracle.

They are everywhere. God is as available as we are having friends that inspire us to rise to higher and greater level is an ausome gift. Surrounded yourself with people that inspire you to do better and inspire your friends as well. It is a profound truth that the people we spend time with shape the path that we travel.

# A TO Z OF SUCCESS

Ku.Bharti R. Charpe
B.Sc.-I

A - Aspire to reach your goal.
B - Believe in yourself.
C - Creat good ideas.
D - Dream about your future.
E - Exercise frequency.
F - Forgive mistakes of others.
G - Glow like a bright star.
H - Humor yourself.
I - Imagine great things.
J - Judge your life nicely.
K - Kindly help others.
L - Love your enemies.
M - Manage yourself in right way.
N - Nature the environment.
O - Organize yourself.
P - Praise performance.
Q - Question most things.
R - Regulates your life.
S - Smile often.
T - Think rationally.
U - Undersatnd yourself.
V - Value your life and time.
W - Work for your goal.
X - X-ray your defects.
Y - Yearn to improve.
Z - Zestfully work for happiness of others.

# TIME AND TIDE WAIT FOR NONE

Ku.Nikita Pande
B.Com. - III

In life, there are certain things which can be done very easily. When the time is facourable. But it may be very difficult to do the same things when the time is unfacourable. It is easy to sail when the tide is favourable. We could wait patiently and act when time is favourable. If we fail to act when time is favourable we miss the chance. Time does not wait for it. When the time is favourable, we must act promptly. The expression of time and tide means favourable occasion or time.

Time is the most valuable thing. In life there are good as well as bad times. For a second some people miss the bus or train which meets with an accident on the way. Many times we see people complaining that there is no time to complete the work but at the same time they should know that it is the same time which the scientists use to invent some new things, the film-makers use to their films, the researches use to carry on their research etc. If they succeed in making the best use of time then why can't we make the best use of time?

When the students have the time they don't utilise it, but when they have to appear the exams, they study the whole portion with extra time and energy and thus fail to use in a proper manner. Here I remember time is short, not for rest, think your own and do your best.

It is very easy to say that, I will do that work in few minutes or I will do that tomorrow. But have we ever thought of the importance of time or do we know the value of time? If not then we should know it :

To know the value of one year, ask the student who failed.

To Know the value of one month, ask the mother to a prematurely born baby.

To know the value of one week, ask the editor of a weekly.

To know the value of one day, ask the daily wager.

To know the value of one hour, ask the true lover waiting to meet.

To know the value of one second, ask the person who escaped an accident.

Many times people complain, that there is no time to read and to make rest, but they should know that there is time to read and even to take rest, if there is proper time management. Scheduled management of time can give you more time to do what you want, improve your availability, improve your productivity, efficiency and effectiveness. Make

you easier to work with, make you feel more relaxed, minimise the risk you take and most importantly reduce stress.

It is easy to waste time but to use the time in a proper way it requires some steps to follow they are ...

1. Keep the time record. Fix time for each activity. See that the work is completed within the time frame.
2. Short time goals : Have short term goals. Set the goal for each day, week and month. This will help you to allocate yourtime and make sure that the time is spent in a systematic manner.
3. Planning : Plan and use your time in such a way that you have a clear idea of what you want to do with the day, map out a definite programme.
4. Interruption : Don't allow any one to disturb you when you are doing an important task so that you may utilise the time in good manner.
5. The best part of your time must be spent for doing important piece of work, while providing enough time for relaxation between one task and another.
6. Make schedules to execute your work in a fruitful manner.
7. Try to begin the work before the schedule time as carrying our the work after the schedule time is not healthy. Thus avoid overworking.
8. Stick at it : Of course, we have to be sensible about how long we keep on short breaks for coffee and chat, but not unless we set a definite time limit to them.
9. Squandering time versus valid down time : Time is squandering if you do low priority things, during periods set aside to work on high priority goals. If you do these same time - wasting activities during the off-time in your schedule there is no problem.
10. Doing it right the first time : Aside from watching TV and shopping, the biggest thief of your valuable time is doing a sloppy job when you get down to a work. If you are not bothered to do it right the first time, then you will not be motivated to do it over.

We must know that, if the farmer did not work in the paddy fields we would not getout daily food in time. If the fire brigade was not in time, at the emergency it would result deaths of many. In the field of sports we also see that different games also have the time limit. Most often we say that at the right time the doctor saved the life of the patient so we see that to save the life of the patient time is very important.

These suggestions when you put them into practice effectively not only help to organise yourself but also lead to correct managements of time.

Time is precious and should not be wasted, whereas tide is a natural process and cannot be stopped both of which wait for none.

# Conservation of Biodiversity

Ku. Puja V. Marotkar
B.A. - III

**How do we conserve Biodiversity :**

When we conserve and protect the whole ecosystem, it's biodiversity at all levels in protected we save the entire forest to save the Tiger. This Approach is called in situ conservation. However, when there are situations where an animal or plant is endorgesed or threatened and needs urgent measures to save it from extinction. ex situ conservation is the desinable approach.

**1) In situ conservation :**

In situ conservation involves conservation of species in it's natural habitat in place where the species normally occurs.

**a) Biosphere reserves :**

The Programme of biosphere reserve was initiated under the 'Man and Biosphere' (MAB) programme by UNESCO in 1971.

A biosphere reserves by UNESCO namely Nilgiri sunderbans and gulf of mannar. A biosphere reserves consist of core, buffer and transition zones.

**b) National Parks :**

They are maintained by government reserved for betterment of wild life. There are 95 existing National parks in India covering an area of 38,024 x 10oKm2, which is 1.116% of geographical area of the country.

**c) Wildlife sanctuaries :**

There are 500 private ownership of land, tilling of land etc are allowed in sancturies. There are 500 existing wildlife sancturies in India covering an area of 1,17,913.45 km2 which is 3.59% of the geographical area of the country.

**d) Sacred forests and lakes :**

These are forest patched around places of worship which are held in high esteem by tribal communities. They are found in several parts of India e.g. Karnataka, Maharashtra, Kerala, Meghalaya etc.

**2) Ex-situ Conservation :**

It involves maintence and breeding of endorgened plants and animal spe under parially or wholly controlled conditions in zoos, nurseries and gardens.

The ex-situ conservation strategies include botanical botanical garden seed banks, clonal collection, zoological park, gene bank etc.

**a) Zoos :**

Zoological gardens are placed whre wild animal are kept for public showing. The central zoo authority (CZA) of India provides financial assistance to zoos & also approves exchange of donations of animals both domestic & foreign for breeding programme.

**b) Botonical Gardens :**

They paly important role in the conservation of plant species. The BSI (Botanical Survey of India) with headquarter and main garden at Sibpur.

**c) Seed Banks :**

The seed bank is an excellent method of conserving diversity. Such sort of conservation is practical by the help of cold storage in seed banks where seeds are stored for long duration. In India seed bank has been set up the NBPGR (National Bureau of Plant Genetic Resources), New Delhi

**d) Pollen Storage :**

Pollen storage is of great importance in the conservation of genetic resources. However the life of pollen is main shorter than seed & a maximum of 3 years in some species has been reported.

**e) Tissue Culture :**

Tissue culture technique can be extended to endanger species or for those which may otherwise require very varies climatic condition and can be maintained at one place in aseptic cultures.

# राष्ट्रीय सेवा योजना अहवाल

**– कार्यक्रम अधिकारी –**

**डॉ.सौ.साधना जिचकार, प्रा.श्रीकांत ठाकरे**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सन २०१८–१९ या शैक्षणिक सत्रात महाविद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शैक्षणिक सत्राच्या प्रारंभी २ ऑगष्ट २०१८ ला महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची सभा घेऊन त्यांना रा.से.यो.चे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.सौ.साधना जिचकार व प्रा.श्रीकांत ठाकरे तसेच प्राचार्य डॉ.विजयबाबू धोटे यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व पटवून दिले.

दिनांक १८ ऑगष्ट २०१८ ला राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने इंदरवाडा या गावामध्ये परिसर स्वच्छता मोहिम राबविण्यात येवून यामध्ये रा.से.यो.च्या स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन परिसर स्वच्छतेचा मूलमंत्र प्रभात फेरीच्या माध्यमातून ग्रामस्थांना पटवून दिला.

दिनांक २४ सप्टेंबर २०१८ ला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन प्राचार्य डॉ.विजय धोटे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला. यावेळी रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.सौ.साधना जिचकार व प्रा.श्रीकांत ठाकरे उपस्थित होते. या कार्यक्रमाप्रसंगी प्राचार्य डॉ.विजय धोटे तसेच रासेयोचे कार्यक्रम अधिकारी यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना रासेयोचे महत्व पटवून दिले.

२ ऑक्टोंबर २०१८ ते ०८ ऑक्टोंबर २०१८ या कालावधीत महात्मा गांधी जयंती निमीत्त्य स्वच्छता मोहिम सप्ताह आयोजित करण्यात येऊन या मोहिमे अंतर्गत महाविद्यालयातील तसेच इंदरवाडा या गावातील परिसर स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. यामध्ये दररोज सकाळी एक तास स्वच्छतेकरिता देण्यात आला. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय धोटे, पालक संचालक श्री.दिनकरराव राऊत, प्राध्यापक वृंद तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दिनांक १० डिसेंबर २०१८ ला मराठी विभागातर्फे आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिनानिमीत्त्य आमचे अधिकार व कर्तव्य या विषयावर डॉ.श्रीधर चामे, सेंट जॉर्ज हॉस्पिटल, मुंबई यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.विजय धोटे, प्रमुख अतिथी म्हणून मनिष गुप्ता,मुंबई हे होते. याप्रसंगी बोलतांना डॉ.चामे म्हणाले की, आमच्या धर्मग्रंथापासूनच आम्हाला अधिकार मिळाले असून याचेच पुढे कायदयात रूपांतर होऊन मुलभुत अधिकार मिळाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.साधना जिचकार यांनी केले. संचालन प्रा.राजेंद्र घोरपडे यांनी तर आभार प्रा.रिता वाळके यांनी केले. या कार्यक्रमाकरिता महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

दिनांक २७ डिसेंबर २०१८ ते २ जानेवारी २०१९ या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यापीठ स्तरीय शिबीर ''स्वच्छतेकरीता युवक'' या मुलमंत्रावर आधारित आयोजित करण्यात आले. या शिबीराचे उद्घाटन मा.आमदार डॉ.आशिषबाबू देशमुख यांचे शुभहस्ते दिनांक २८/१२/२०१८ ला पार पडले. याप्रसंगी बोलतांना ते म्हणाले की, युवकांमध्ये स्वावलंबी होण्याची भावना निर्माण करण्याकरीता युवकांनी प्रचंड मेहनत करावी तसेच भारत देशामध्ये निरोगी वातावरण निर्माण करण्याकरीता स्वच्छतेचा मुलमंत्र घराघरात पोहचविला पाहिजे. असे उद्गार मा.आमदार डॉ.आशिषबाबू देशमुख यांनी राष्ट्रीय सेवा योजना विद्यापीठस्तरीय शिबीराचे उद्घाटनप्रसंगी व्यक्त केले. शिबीराच्या उद्घाटनप्रसंगी पालक संचालक मा.दिकनरराव राऊत, ॲड.दिपक केने, श्री.दिलीप तिजारे, श्री.रमेश फिस्के यांनी आपले विचार व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर डॉ.भाऊसाहेब भोगे, सरपंच सौ.रेखाताई उईके, उपसरपंच श्री.गुणवंतराव बोढाळे, चितामुनीश्वर संस्थाचे अध्यक्ष श्री.विठ्ठलराव बारई, श्री.धर्मेंद्रजी पालीवाल, श्री.रमेश चरपे तसेच सभोवतालच्या गावातील मान्यवर मंडळी उपस्थित होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.विजय धोटे यांनी केले. डॉ.प्रकाश पवार यांनी सुत्रसंचालन तर आभार रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा.श्रीकांत ठाकरे यांनी मानले. या सात दिवसीय शिबीरामध्ये ग्रामसफाई, पथनाट्य, जनजागृती, व्यसनमुक्ती अभियान, स्त्रीभृणहत्या, परिसंवाद, वादविवाद तसेच विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

शिबीराच्या सांगता समारोह दिनांक १ जानेवारी २०१९ ला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विनायकराव देशपांडे यांचे शुभहस्ते संपन्न झाला. स्वच्छता मोहिमेत युवकांचा सक्रिय सहभाग असल्याशिवाय स्वच्छ, समृद्ध